मंगळवार, ९ जानेवारी २०२४
⊙ किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
⊙ मराठी ⊙ दैनिक
⊙ वर्ष - ०३ ⊙ अंक - १४५
⊙ आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

# आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

● MARATHI ● DAINIK ● CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) TUESDAY 9 JANUARY 2024 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ● YEAR-03 ● ISSUE-145 ● RNI : MAHMAR/2021/82566 ● PAGE-12 ● PRICE-05

# सर्वोच्च न्यायालयाचे गुजरात सरकारवर ताशेरे

## बिल्किस बानो प्रकरण : ११ आरोपींची शिक्षा माफ करण्याचा दिला होता निर्णय

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली : बिल्किस बानो सामुहिक बलात्कार प्रकरणातील आरोपींना महाराष्ट्रातील न्यायालयाने शिक्षा सुनावली होती. त्यामुळे यासंदर्भात महाराष्ट्र सरकारनेच निर्णय घेणे योग्य ठरले असते. पण गुजरात सरकारने दोषींसोबत मिळून यासंदर्भात कारवाई केली. याच शक्यतेमुळे सर्वोच्च न्यायालयाने हा खटला गुजरातबाहेर दुसऱ्या राज्यात वर्ग केला. या संपूर्ण प्रकरणात गुजरात सरकारने घेतलेले निर्णय म्हणजे सरळ सरळ अधिकारांचा गैरवापर आहे. या न्यायालयाने दिलेल्या निकालाचा कायद्याचे उल्लंघन करण्यासाठी वापर करण्याचे हे आदर्श उदाहरण आहे, अशा शब्दांत न्यायालयाने गुजरात सरकारवर सर्वाच्च न्यायालयाने ताशेरे ओढले आहेत.**



बिल्किस बानो सामुहिक बलात्कार प्रकरणातील ११ आरोपींची शिक्षा माफ करण्याचा निर्णय गुजरात सरकारने घेतला होता. या निर्णयावर देशभरातून तीव्र प्रतिक्रिया उमटल्या होत्या. या निर्णयासंदर्भात बिल्किस बानो यांनी थेट सर्वोच्च न्यायालयात दाद मागितली होती. अखेर बिल्किस बानो यांना न्याय मिळाला असून गुजरात सरकारने या ११ आरोपींची शिक्षा माफ करण्याचा घेतलेला निर्णय सर्वोच्च न्यायालयाने रद्द ठरवला आहे. २००२ च्या गुजरात दंगलींदरम्यान बिल्किस बानो यांच्यावर ११ आरोपींनी सामूहिक बलात्कार केल्याची घटना घडली होती. त्यापाठोपाठ त्यांच्या कुटुंबातील सात जणांची निर्घृण हत्याही करण्यात आली होती. त्यांच्यावर बलात्कार केल्याच्या प्रकरणात या ११ आरोपींना जन्मठेपेची शिक्षाही झाली. मात्र, गेल्या वर्षी यातील काही आरोपींची उर्वरीत शिक्षा माफ करून त्यांची तुरुंगातून सुटका करण्याचा निर्णय गुजरात सरकारने घेतला. या निर्णयाविरोधात बिल्किस बानो यांनी सर्वोच्च न्यायालयात दाद मागितली होती. सोमवारी या प्रकरणी न्यायालयाने आपला निकाल दिला आहे. दरम्यान, सर्वोच्च न्यायालयाने या खटल्याचा निकाल देताना गुजरात सरकारला फटकारले आहे. हा गुन्हा जरी गुजरातमध्ये घडला असला, तरी महाराष्ट्रात या प्रकरणी आरोपींवर खटला चालून त्यांना शिक्षा सुनावण्यात आली होती. त्यामुळे गुजरात सरकारला आरोपींची शिक्षा माफ करण्याचा निर्णय घेण्याचा अधिकारच नाही. त्यामुळे, या प्रकरणात निर्णय घेण्याचा अधिकार महाराष्ट्र सरकारच्या अखत्यारीत येतो. त्यामुळेच गुजरात सरकारने या ११ आरोपींची शिक्षा माफ करण्याचा घेतलेला निर्णय रद्द ठरवला जातो, असे न्यायालयाने यावेळी नमूद केले. शिक्षा कमी करण्याचा निर्णयामुळेच हे ११ आरोपी तुरुंगातून सुटले होते. आता तो निर्णयच सर्वोच्च न्यायालयाने रद्दबातल ठरवल्यामुळे या आरोपींना पुन्हा अटक केली जाणार का? दोषींच्या सुटकेनंतर त्यांचा स्वातंत्र्याचा अधिकार अबाधित राहाण्याची मागणी गैरलागू आहे. कारण समानतेच्या वातावरणातच स्वातंत्र्याच्या अधिकाराचा विचार होऊ शकतो. दोषींप्रमाणेच पीडितांच्याही अधिकारांचा न्यायालयाला विचार करणे क्रमप्राप्त आहे. समानतेशिवाय कायद्याचे राज्य अस्तित्वात येऊ शकत नाही. अशा प्रकारे गुन्ह्याच्या परिणामांपासून गुन्हेगारांना मोकळीक देणे समाजातील शांततेला चूड लावण्यासारखे होईल. त्यामुळे सर्व ११ गुन्हेगारांनी येत्या २ आठवड्यांत पुन्हा पोलिसांना शरण यावे. कायद्याचे राज्य राखले गेलच पाहिजे, असे स्पष्ट आदेश न्यायालयाने आपल्या निकालात दिले आहेत. गुन्हेगारांना पुन्हा शिक्षामाफीसाठी प्रयत्न करायचे असतील, तर त्यासाठी त्यांनी आधी शिक्षा भोगण्यासाठी तुरुंगात असणे गरजेचे आहे, असेही न्यायालयाने यावेळी नमूद केले.

> न्यायमूर्ती बी. व्ही. नागरत्ना व न्यायमूर्ती उज्जल भुयान यांच्या खंडपीठासमोर या याचिकेवर सुनावणी झाली. मे २०२२ मध्ये सर्वोच्च न्यायालयाने या प्रकरणातील एका आरोपीने दाखल केलेल्या याचिकेवरील सुनावणीदरम्यान शिक्षा कमी करण्यासंदर्भात गुजरात सरकारने निर्णय घ्यावा, असे निर्देश दिले होते. हा निकाल न्यायालयाने यावेळी अपुऱ्या पुराव्यांच्या आधारे दिल्याचं नमूद करत रद्द ठरवला. गुजरात सरकारने २०२२ मध्ये बिल्किस बानो सामुहिक बलात्कार खटल्यातील सर्व ११ आरोपींची शिक्षा माफ करून त्यांची सुटका केली होती. या खटल्यात जन्मठेपेची शिक्षा झालेला एक आरोपी राधेश्याम शाह याला मुंबईच्या सीबीआय न्यायालयानं शिक्षा सुनावली होती. शिक्षेची १५ वर्षं पूर्ण केल्याचा हवाला देत त्यानं तुरुंगातून सुटकेची मागणी केली होती.

## जरांगे यांच्या विरोधात जनहित याचिका

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** मनोज जरांगे यांनी सर्व मराठा समाजाला मोठ्या संख्येने 20 जानेवारीला आझाद मैदानावर येण्याचे आवाहन केले आहे. मात्र त्याआधी जरांगे पाटील यांच्या विरोधात उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल केली आहे. जरांगे यांनी मुंबईत आंदोलन करु नये, यासाठी ही याचिका दाखल करण्यात आली आहे. हेमंत पाटील यांनी ही याचिका दाखल केली आहे.

ओबीसी आणि मराठा दोन्ही समाजाने आझाद मैदानावर आंदोलनाची परवानगी मागितली आहे. यामुळे दोन्ही समाज समोरासमोर येवून कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होवू शकतो. 2 कोटी लोकांसोबत मुंबईत येणार असल्याचे मनोज जरांगे म्हणाले. यापैकी एक कोटी मराठा बांधव मुंबईत आले तर मुंबई वेठीस धरली जावू शकते. मुंबईच्या गतीमानतेवर याचा परिणाम पडेल. मुबईकरांना याचा नाहक त्रास होईल. देशाची आर्थिक राजधानी असलेल्या या शहरावर याचा परिणाम पडेल. त्यामुळे मनोज जरांगे यांच्या आंदोलनावर न्यायालयाने योग्य निर्णय द्यावा, असे हेमंत पाटील यांनी म्हटले आहे.




दोन दिवस ट्रक चालकांचा संप असल्याची बातमी कानावर येताच छत्रपती संभाजीनगरमधील पेट्रोल पंपांवर नागरिकांनी प्रचंड गर्दी . छायाचित्र : संजय व्यापारी


# भाविक-वारकऱ्यांनी घेतले संत जनार्दन स्वामी पादुकांचे दर्शन




आधुनिक केसरी न्यूज

प्रकाश लकडे

**दौलताबाद :** भानुदास एकनाथ च्या गजरात दिंड्या दौलताबाद (देवगिरी) येथील संत जनार्दन स्वामी यांची पूण्यतिथिनीमित्ताने मोठी यात्रा भरते. ऐतिहासिक दौलताबाद किल्ल्यावर दुर्गा तोपेचा खाली एका गूहेत संत जनार्दन स्वामी यांची चरण पादुका असून समाधीस्थान येथेच आहे. त्यांची पुण्यतिथी निमित्तानं आज दि. ७ रविवार रोजी मोठ्या उत्साहात भजन ,किर्तन चालते. दरवर्षी त्यांच्या वंशजांची दिंडी आजही येथे येते व अशा अनेक ठिकाणच्या दिंड्या मोठ्या संख्येने येतात. दौलताबाद गावात बारा ते पंधरा मठ आहे या मठामध्ये रात्री भजन कीर्तन,भारुड ,गौळणी आदि कार्यक्रम चालतात त्याच संत जनार्धन स्वामी महाराज पुण्यतिथी निमित्त दिंडी घेऊन जात उत्सव साजरा झाला व दिंडी देवगिरीकडे भानुदास एकनाथ गजर करत रवाना झाली. हभप . मुरारी महाराज आनंदी ह भ प बाळकृष्ण महाराज ह भ प परमेश्वर महाराज कोरडे, दरवर्षी देवगिरी दौलताबाद येथे संत जनार्धन स्वामी महाराज यांच्या पुण्यतिथी साठी आपल्या संत सोबत्यांना दिंडीद्वारे सोबत घेत हरीनाम घेत प्रवचन, कीर्तन करत करत देवगिरी येथे मुकामास जातात. व तेथे सायंकाळी जाहीर कीर्तन करत दुसऱ्या दिवशी काला घेऊन माघारी फिरतात हा असा आव्हायाहत चालणारा हरीनामाचा महिमा आहे. देवगिरीच्या दिशेने रवाना मोठ्या संख्येने उपस्थित होते. तसेच .देवगिरी दौलताबाद पंचक्रोशीतील भाविक मोठ्या प्रमाणात दर्शनासाठी येतात जागोजागी नारळ,हार,फूले,खेळणी साहीत्याच्या दुकानाची गर्दि असते यात्रे निमित्त भाविकांची गर्दि लक्षात घेवून भाविक भक्त मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.








विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

आधुनिक केसरी

तसा समाज घडवण्यासाठी त्यांच्याजवळ इच्छाशक्ती असावी लागते. राममंदिर होणार याचा आनंद आहेच पण उच्च नैतिक मूल्ये, शांत, समाधानी आणि संयमित जीवन जगणारा समाज, एकमेकांचा आदर करणारे नागरिक, गुरुजनांना शीर्षस्थानी बसवणारा आदर्श समाज निर्माण करायचा असेल, तर तो जाणीवपूर्वक घडवावा लागेल. प्रभू श्रीरामांचे गुण अंगी बाणवावे लागतील. रामाचे अतिशय सुंदर, भव्य आणि देखणे मंदिर भलेही आम्ही निर्माण करू, पण रामराज्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करावे लागतील. त्याचाच संकल्प या नवीन वर्षात करू या. आपल्या आरोग्यासाठीचे संकल्प तर आपण नववर्षानिमित्त करूच पण हे संकल्प करतानाच निसर्गाचे स्रोत मर्यादित आहेत. ते मी जपून वापरीन, पाणी, ऊर्जा, जलसाठे या गोष्टी मर्यादित आहेत. त्या मी काटकसरीने वापरेन. प्लास्टिकचा वापर शक्य होईल तितका कमी करेन. माझं आणि माझ्या कुटुंबाचं हित साधताना मी समाजाचं सुद्धा काही देणं लागतो या भावनेतून माझ्या उत्पन्नातील किमान दहा वीस टक्के भाग समाजाच्या हितासाठी वापरेन असेही काही नवीन संकल्प नवीन वर्षात घेऊ या. नवीन वर्षात ठरवून वाचण्यासाठी वेळ देऊ या. आपली दृष्टी जाणीवपूर्वक विशाल करू या. याप्रसंगी मला आपले माजी पंतप्रधान भारतरत्न अटल बिहारी वाजपेयी यांच्या कवितेतील ओळी आठवत आहेत. आपल्या ' आओ फिरसे दिया जलाये ' या कवितेत ते म्हणतात हम पडाव को समझे मंजिल लक्ष्य हुआ आँखोंसे ओझल वर्तमान के मोहजाल में आनेवाला कल न भुलायें आओ फिरसे दिया जलाये ।सगळीकडे निराशाजनक वातावरण असताना अंतरातील स्नेहाने ही ज्योत आपल्याला पुन्हा प्रज्वलित करायची आहे असे अटलजी म्हणतात. नवीन वर्षाची सकाळ त्यासाठीच जणू आपली वाट पाहते आहे. नवीन वर्षात शक्ती, बुद्धी आणि धैर्य देण्यासाठी रामरायाचे स्मरण करू या. मनी धरावे ते होते । विघ्न अवघेचि नासोनि जाते । कृपा केली रघुनाथे । प्रचिती येते ।। श्रीराम ।। आपणा सर्वांना नवीन वर्षाच्या शुभेच्छा !






## आनंदी पहाट

### सहजीवनात तुझे-माझे करणे तापदायक

आधुनिक केसरी

अलीकडच्या काळांत पती-पत्नीच्या मतभेदाला, वादाला पत्नीच्या जवळच्या नातलगांना जबाबदार धरले जात असल्याचे दिसून येते. काही प्रमाणांत त्यांचा सहभाग गरजेपेक्षा, जरुरीपेक्षा अधिक असल्याचे देखील चित्र दिसून येते. ह्यांतही आर्थिक बाब प्रकर्षाने वादाचे निमित्त असल्याचे कळते. काहीवेळा मानसिक पातळींवर होणारे परिणाम इतके गंभीर असतात, कि संबंधित व्यक्ती जीव देण्या-घेण्याची कृती करण्यास प्रवृत्त होते, ते थांबलेच पाहिजे. अनेकदा स्वभावापेक्षा प्रभावाला महत्व अधिक दिले जाते.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

कालांतराने परस्परांमधील आभावांची जाणीव व्हायला लागते, दुरावा निर्माण होऊ लागतो. संवादाआभावी निर्माण होणाऱ्या गैरसमजुतीचे वादांत रुपांतर होऊ लागते. रोजच्या कामांतून थोडा वेळ काढून आपले रुटीन, काम आणि मुले असे मुद्दे वगळून एकमेकांशी संवाद साधला तर हे नाजूक संबंध मजबूत व्हायला मदत होऊ शकते. ह्यासाठी स्वार्थ नाही तर परमार्थ महत्वाचा असतो, हे समजून घेतले पाहिजे. कौटुंबिक कलहांची सुरुवात आर्थिक कारणांमुळे होत असल्याचे अनेकदा समजते. विवाहानंतर उभयतांनी मिळवलेले आपापले उत्पन्न हे स्वतःसाठीसुद्धा न वापरता जोडीदाराने मिळवलेल्या पैशावर हक्क दाखवायचा, त्यांतूनच खर्च करायचा आणि स्वकमाईतून मिळालेला पैसा शिल्लक ठेवायचा. ह्यामुळे निर्माण होणाऱ्या समस्या सोडवण्यासाठी केवळ पैशाचीच गरज भासू लागते. स्वअर्थ नाही तर परम अर्थ हीच भावना रुजणे तापदायक, घातक ठरू शकते, ही जाणीव होणे आवश्यक असते. आर्थिक पातळीवर माझे ते माझेच आहे, पण तुझे सुद्धा माझेच आहे, असा विचार करणारी व्यक्ती मानसिक पातळीवर मात्र तुझे-माझे करून मोकळे होताना दिसते. एकाच कुटुंबात राहून देखील प्रत्येकाचा आर्थिक ताळेबंद मात्र स्वतंत्र तयार होतो. त्या ताळेबंदला कोणतेही ताळतंत्र नसते, तो ज्याच्या त्याच्या टाळेबंद कपाटात सुरक्षित ठेवलेला असतो.



आधुनिक केसरी

### विश्वाची माऊली | संजीवन ||

ओवी ज्ञानेशाची | मना सुख देई ||
चांगभलं होई | आयुष्याचे ||१||
बोली भाषा गोड | प्रगटे सहज ||
लडीवाळ गुज | गीता-आई ||२||
मुढा लावी गोडी | ऐसे हे नवल ||
ज्ञानाईचे बोल | काय वर्णु ? ||३||
बोलविला ज्याने | रेड्या मुखी वेद ||
नसे भेदाभेद | त्याचे ठायी ||४||
ज्ञानीयांचा गुरू | योग्यांची सावली ||
विश्वाची माऊली | संजीवन ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## निरुपण


आधुनिक केसरी

या येका कामासाठीं ।जन्म गेला आटाटी ।
वय वेचल्यां सेवटीं ।येकलेंचि जावें ॥४८॥
ऐसा मनीं प्रस्तावला ।क्षण येक उदास जाला ।
सर्वेंचि प्राणी झळंबला ।मायाजाळें ॥४९॥
कन्यापुत्रीं आठवलीं ।मनींहुनि क्षिती वाटली ।
म्हणे लेंकुरें अंतरलीं ।माझीं मज ॥५०॥

## घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !

एकाकार वृत्ति चित्त की,
सद्गुरु वाक्यन राख ।
हृदय गोप्य फणि मणि सम, समाधानता
भाख ।।११२।।(स्वर्वेद षष्ठ मण्डल
षष्ठ अध्याय) ०६/०६/११२

मूळ भाष्याचा मराठी अनुवाद : ज्याप्रमाणे मणीवाला सर्प आपला मणी अंतरात गुप्तपणे लपवून ठेवतो त्याप्रमाणे सद्गुरूंचा उपदेश आणि आदेशयुक्त वचनांमध्ये असलेला अनन्य भाव यत्न पूर्वक हृदयात सांभाळून ठेवणे, याला समाधानता म्हणतात.



स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.

## ब्रम्हज्ञान

आधुनिक केसरी

शब्द हे दुधारी शस्त्र आहे.त्याचा कुठे आणि कसा वापर करायचा हे ज्ञानी माणसाला बरोबर कळते. पण अर्थहीन बडबड करणारे वाचाळवीर समाजात पदोपदी पहायला मिळतात. आणि म्हणून म्हणावेसे वाटते की अन्वये आणि वितरेक|
हा शब्द भेद कोणीयेक| निःशब्दाचा अंतरविवेक
| शोधला पाहिजे. लक्ष्यांशावर लक्ष केंद्रित करून स्वस्वरूपाचा अनुभव घ्यावा.




सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

स्वरूपाच्या अनुभवामध्ये शब्द बोलण्याचे काम नाही.
तर ते कृतीत आणण्याचे काम करतात. कारण शब्दांच्या पलीकडे असणारा अनुभव शब्दात सांगताच येणार नाही. निः शब्दांच्या अवस्थेत जाणे ही स्वरूपानुभवाची प्रमुख खूण आहे. म्हणून त्या अनुभवामध्ये शब्द बोलण्याची ऊर्मीच रहात नाही.

## संत हे आपला संबंध भगवंताशी जोडतात

आधुनिक केसरी

आपले हृदय विषयाने इतके भरले आहे, की तिथे भगवंताच्या प्रेमाला जागाच राहिली नाही. बरे, भगवंताचे प्रेम मुद्दाम तिथे घातले, तर ते आत न राहता बाहेर पडते आणि वाऱ्यावर उडून जाते. सामानाने गच्च भरलेली जशी एखादी खोली असते, तसे आपले हृदय आहे. या हृदयाचा संबंध भगवंताशी जोडण्यासाठी, आपल्या हृदयातले सामान, म्हणजे विषय, खाली करून त्याच्या जागी भगवंताचे प्रेम भरणे जरूर आहे. साधारणपणे आपला अनुभव असा आहे की, एखादी वस्तू आपल्याला पुष्कळ आणि पुन्हापुन्हा मिळाली तरी तिचा वीट येतो; म्हणून जी वस्तू आपल्याला कितीही मिळाली तरी तिचा वीट येणार नाही अशी वस्तू आपण मिळवावी. अशी अवीट असणारी वस्तू एकच आहे; ती म्हणजे भगवंत होय. राजाने आपल्या नावाचा शिक्का केला, आणि जो अती प्रामाणिक होता त्याच्याजवळ दिला; त्याप्रमाणे भगवंताने आपले नाम संतांना दिले. त्यामुळे, संत जे करतील त्याला मान्यता देणे भगवंताला जरूरच आहे. आपण आणि संत



यांच्यामध्ये मनुष्य या दृष्टीने फरक नाही; पण फरक आहे तो हा की, संत हा जसे बोलतो तसे वागतो, तर आपण बोलतो चांगले आणि वागतो मात्र त्याच्या उलट. आपल्या स्वार्थाच्या आड कोणी आले की आपण वाईट बोलतो. ज्याच्यावर आपण प्रेम करतो त्याच वस्तूवर दुसऱ्याने प्रेम केले तर आपण त्याला नावे ठेवतो. आपण नुसती नीतीची तत्त्वे जेव्हा सांगतो तेव्हा अगदी चांगले बोलतो; पण वागताना मात्र उलट वागतो. यासाठी आपण अशी कृती करू या, की आपल्याला नंतर तसे बोलता येईल. गाडीत बसायला मिळावे म्हणून काही कोणी गाडीत बसत नाही तर आपल्या स्टेशनाला जाण्यासाठीच मनुष्य गाडीचा आधार घेतो. तसा, मोठमोठ्या संतांनी प्रपंच केला खरा, परंतु तो सुखासाठी केला नाही. आपल्या वृत्तीपासून न ढळता इतरांना तारण्याचे काम संतांनी केले. बुडणाऱ्या माणसाला जसा दोरीचा आधार द्यावा, त्याप्रमाणे संतांनी आपल्याला परमात्म्याचा आधार दिला. चंदनाच्या झाडाजवळच्या झाडांना जसा चंदनाचा वास लागतो, त्याप्रमाणे संताजवळ राहतो तोही संतच बनतो. काही कष्ट न करता परमार्थ साधणे हेच सत्संगतीचे महत्त्व आहे.

**११६. आपण प्रपंचात इतके खोल जातो की संतांची हाकच ऐकू येत नाही. ती ऐकू येईल इतक्या तरी अंतरावर असावे.**

## गहिनीनाथ

आधुनिक केसरी

याप्रमाणे प्रकार घडल्याची बातमी गावभर झाली. तेव्हा गावचे लोक भेटीस जाऊन मुलाची चौकशी करीत तेव्हा नाथहि सर्व वृत्तांत सांगत; तो ऐकून त्यांना नवल वाटे. मच्छिंद्रनाथाने आपल्या शिष्याकडून मातीचा पुतळा जिवंत करविला, ह्यास्तव ब्रह्मदेवापेक्षा मच्छिंद्रनाथाची योग्यता विशेष होय, असे जो तो बोलू लागला. तेथून पुढे तीर्थयात्रा करीत फिरताना मुलासहि बरोबर नेणार असा मच्छिंद्राचा मानस पाहून, त्यामुळे मुलाची अनास्था होईल मुलाचे आईवाचून संरक्षण व्हावयाचे नाही, म्हणून मुलास कोणाच्या तरी हवाली करा, असे पुष्कळांनी मच्छिंद्रनाथांस सुचविले. ते ऐकून, तसे होईल तर फारच चांगले होईल असे नाथाने उत्तर दिले. अशा तऱ्हेने मच्छिंद्रनाथांचा रुकार मिळाल्यानंतर मुलास कोणाच्या तरी माथी मारावा असा गावकऱ्यांनी घाट घातला. मग मधुनाभा या नावाचा एक ब्राह्मण तेथे राहात होता. त्याची गंगा ह्या नावाची स्त्री महापतिव्रता होती.

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक
मंगळवार, ९ जानेवारी २०२४
adhunikkesari.com Adhunik Kesari

# पास करण्यासाठी पैसे घेणाऱ्यांवर कारवाई कधी करणार ?

## अतुल लोंढे : अकॅडमिक कौन्सिल बैठकीत चुका झाल्याचे मान्य, मग गुन्हा दाखल का केला नाही ?

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठातील विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी खेळ करत पास होण्यासाठी पैसे मागितले जात असल्याचा प्रकार नुकताच उघड केला. अकॅडमिक कौन्सिलच्या बैठकीतही चुका झाल्याचे स्पष्टपणे मान्य करण्यात आले आहे तरीही अद्याप संबंधित दोषींवर गुन्हा दाखल केलेला नाही. इंजिनिअरिंग व फार्मसीसारख्या विभागात असा सावळा गोंधळ होत असेल तर कोणतीही कंपनी महाराष्ट्रातील इंजिनिअर व फार्मसिस्टना नोकरीवर घेणार नाही हे अत्यंत गंभीर आहे, या प्रकरणी विद्यार्थ्यांना न्याय मिळावा अन्यथा काँग्रेस आपल्या मार्गाने प्रश्न सोडवेल असा इशारा प्रदेश काँग्रेसचे मुख्य प्रवक्ते अतुल लोंढे यांनी दिला आहे.

यासंदर्भात पत्रकारांशी संवाद साधताना अतुल लोंढे पुढे म्हणाले की, इंजिनिअरिंगचे पेपर ऑनलाईन तपासले जातात व ऑनलाईन नापास केले जाते. या नापास विद्यार्थ्यांना पास करण्यासाठी पैसे द्या असे मेसेज टेलिग्रामवरून पाठवले जातात. अकॅडमिक कौंसिलच्या बैठकीत अशा प्रकारच्या चुका झाल्याचे स्पष्टपणे मान्य करण्यात आले आहे पण कारवाई मात्र केलेली नाही. फेरतपासणीचे निकाल लागले नसतानाच दुसरी परिक्षा घेण्यात आली. फेरतपासणीत हे विद्यार्थी पास झाले तर काय करणार ? तुम्ही पास होणार नाही असे विद्यार्थ्यांना सांगितले जाते, म्हणजे विद्यार्थ्यांना ठरवून नापास करता का ? आणि फेरतपासणीचा निकाल न लावता परीक्षा कशी घेतली ? या विद्यापीठातील जवळपास ११ हजार विद्यार्थ्यांचा हा प्रश्न आहे, एवढ्या विद्यार्थ्यांचे नुकसान करण्याचा अधिकार यांना कोणी दिला ? संबंधित लोकांवर गुन्हा दाखल का केला नाही ? कोणाला वाचवण्याचा हा प्रयत्न आहे. ऑनलाईन पेपर तपासणाऱ्या खाजगी कंपनीला ब्लॅकलिस्टमध्ये का टाकले नाही ? विद्यार्थ्यांच्या भविष्याशी खेळण्यांवर काय कारवाई केली ? FIR का दाखल केला नाही ? याची उत्तरे मिळाली पाहिजेत.

राज्यपाल महोदय हे कुलपती आहेत, त्यांच्याकडे याप्रश्नी वेळ मागितला आहे, ते विद्यार्थ्यांना न्याय देतील अशी अपेक्षा आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाने चालवल्या जाणाऱ्या विद्यापीठात असे प्रकार होत आहेत हे अतिशय गंभीर आहे, असे अतुल लोंढे यांनी म्हटले आहे.

# लोह्यात हभप रंगनाथ महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त भव्य शोभायात्रा

आधुनिक केसरी न्यूज

**लोहा :** सकल अर्य वैश्य समाजाचे संत गुरुवर्य हभप रंगनाथ महाराज परभणीकर यांच्या पुण्यतिथी निमित्त लोह्यातील आर्य वैश्य समाजाच्या वतीने रंगनाथ महाराजांच्या प्रतिमेची लोहा शहरातील प्रमुख मार्गावरून भव्य शोभायात्रा काढली. शोभायात्रेत कर्णमधुर वाद्य, टाळ मृदंगाचा गजर आणि फटाक्यांची आतिषबाजी शहर वाशियांचे आकर्षण ठरले. लोहा शहरातील विठ्ठलवाडी येथील नगरेश्वर मंदिरात अभिषेक करून हभप रंगनाथ महाराज परभणीकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून चार आश्वंच्या फुलांनी सजवलेल्या रथातून रंगनाथ महाराजांच्या प्रतिमेची शोभायात्रा शहरातील प्रमुख मार्गावरून काढण्यात आली. दरम्यान टाळ मृदंगाच्या गजराने शहर भक्तीत न्हाले होते. भाजी मंडई, लातूर रोड बाजार कमान, मोंढा, बाजार कमान एक मार्गे नगरेश्वर मंदिर येथे विसर्जित करण्यात आली. महाप्रसादाने शोभायात्रेचा समारोप झाला. शोभायात्रा भाजी मंडई चौकात येताच फुलांची मुक्त उधळण व फटाक्यांची आतिषबाजी करण्यात आली. पुरुष मंडळींनी शुभ्र वस्त्र तर महिलांनी केसरी वस्त्र परिधान केले होते. शोभायात्रा अतिशय शिस्तबद्ध पद्धतीने काढण्यात आली. शोभायात्रा दरम्यान हभप रंगनाथ महाराज यांच्या तैलचित्रास अनेक मान्यवरांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.



यावेळी माजी आ. रोहिदास चव्हाण, शिवसेनेचे नेते व पिंपरी चिंचवड मनपाचे माजी गटनेते एकनाथ पवार, भाजपचे युवा नेते माजी जि. प. सदस्य प्रवीण पाटील चिखलीकर, माजी नगराध्यक्ष किरण वट्टमवार, भाजपचे ज्येष्ठ नेते केरबा सावकार बिडवई, सोनीचे संचालक बालाजी सावकार कोटगिरे, आर्य वैश्य समाज संघटनेचे अध्यक्ष दिनेश तेलालवर, व्यापारी असोशियशनचे अध्यक्ष नामदेव कटकमवार, कांता बिडवई, नगरसेवक संदीप दामकोंडवार, प्रवीण भोस्कर, चंद्रकांत कोंडावार, पत्रकार विजय चन्नावार, संजय रहाटकर, संतोष चेऊलवार, संदेश कोटलवार, संतोष बच्चेववार, भूषण दामकोंडवार, सचिन अंकुलवार, वेदांत कोंडावार, आदींसह बहुसंख्येने तरुण, महिला, पुरुष समाज बांधवांची उपस्थिती होती. विशेष म्हणजे आर्य वैश्य समाज बांधवांनी स्वतःचे व्यवसाय, प्रतिष्ठान बंद ठेवून शोभायात्रेत सहभागी झाले हे विशेष.

# लोंबकळणाऱ्या तारांपासून सावधान!

आधुनिक केसरी न्यूज



**चाँद खां पठाण**

**बाजार सावंगी :** तालुक्यातील बाजार सावंगी महसूल मंडळ मध्ये मौजे बोडखा व अन्य इतर ठिकाणी महावितरण कंपनीची विद्युत पुरवठा खांबावरील इलेक्ट्रिक तारी एकदम खाली म्हणजे छाती कमरा पर्यंत चारपाच फुटांवर खाली आलेली असल्याने दैनंदिन कामात नागरिक व गुरं ढोरे यांना धोका निर्माण झाला असुण मात्र विभाग झोपेत असल्याचे चित्र आहे. यासंदर्भात खुलताबाद येथील वार्षिक आमसभेत हा प्रश्न नागरिकांनी मांडून विभाग व मा.आ.प्रशांत भाऊ बंब यांचे लक्ष वेधले व अवगत करून यावर काम करण्याची सूचना ही आमदार यांनी संबंधित विभाग अधिकाऱ्यांना दिली. परंतु महावितरण कंपनी झोपेत असुण सध्या बोडखा शिवारात व अन्य इतर अनेक ठिकाणी तालुक्यात ठिकठिकाणी तारी खाली आलेली असुण पाहणी करून तारी वर करुन घेण्याची गरज निर्माण झाली आहे. नसता दैनंदिन कामात नागरिक शेतकरी व गुरं ढोरे यांना धक्का लागून अपघात होण्याची शक्यता आहे. याची दखल विभागांचे वरिष्ठ अधिकारी यांनी घेवून तालुक्यातील ठिकठिकाणची खाली आलेली तारी वर करुन शेतकरी नागरिक गुरें ढोरे यांची सुरक्षता राखावी असी मागणी शेतकरी नागरिकांतून होत आहे, नसता काही अनुचित प्रकार धोका घडल्यास सर्वस्वी जबाबदार महावितरणची राहील असा इशारा नागरिकांतून देण्यात आला आहे.

# 'या' राज्यांमध्ये आजपासून पुन्हा अवकाळी !

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** बदलत्या वातावरणामुळे सारेच त्रस्त असून गरम कपडे घालायचे की रेनकोट सोबत ठेवायचा, असा प्रश्न नागरिकांसमोर उभा ठाकला आहे. देशभरातच वेस्टर्न डिस्टर्बन्समुळे वातावरणात बदल झाला आहे. परिणामी थंडीची जागा आता ढगाळ वातावरणाने घेतली आहे. राज्यातील काही भागांत अवकाळी पावसाच्या सरी कोसळल्या. तर ही परिस्थिती कायम राहणार असून पुन्हा एकदा अवकाळी पावसाची शक्यता भारतीय हवामान खात्याने वर्तवली आहे.

आजपासून बुधवारपर्यंत राजस्थान व मध्यप्रदेशच्या पश्चिम भागात अवकाळी पावसाचा अंदाज आहे. उत्तर-पश्चिम आणि मध्य भारतात कडाक्याची थंडी असली तरीही काही भागांत पावसाचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. तसेच उत्तर भारतातसुद्धा काही राज्यांमध्ये अवकाळी पावसाची शक्यता आहे. सोमवार आणि मंगळवार असे दोन दिवस पंजाब, चंदीगड, दिल्ली, उत्तराखंड, हरियाणा, हिमाचल प्रदेश तसेच गुजरात, मध्यप्रदेश येथे पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे.

# व्हॉईस ऑफ मीडियाचे सामाजिक उपक्रम अभिनंदनीय : तहसीलदार तेजनकर

आधुनिक केसरी न्यूज

**वसंत पाटील**

**वाशिम :** पत्रकारिता समाज घडविण्याचे व राष्ट्रहित जपण्याचे सर्वात मोठे साधन आहे, याचा प्रत्यय आज येथे आल्यानंतर प्रत्यक्ष पहावयास मिळाला आहे.कारण पत्रकार दिनाचे औचित्य साधुन, व्हॉईस ऑफ मीडियाने केवळ पत्रकारांसाठीच नव्हे; तर समाजातील इतर घटकांसाठी सामाजिक उपक्रम राबविले ही अभिनंदनीय बाब असल्याचे गौरवउदगार रिसोडच्या तहसिलदार प्रतिक्षा तेजनकर यांनी काढले आहेत. पत्रकार दिनानिमित्त व्हॉईस ऑफ मीडियाने आयोजित केलेल्या कार्यक्रमात उदघाटक म्हणुन बोलत होत्या. सदर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी व्हॉईस ऑफ मीडियाचे जिल्हाध्यक्ष भागवत मापारी होते. तर मुख्याधिकारी सतीश शेवदा, बाजार समितीचे सभापती संजय शिंदे, पंचायत समितीचे सभापती बंडू हाडे, हृदयरोग तज्ञ डॉ. प्रशांत आटोळे, नेत्ररोग तज्ञ डॉ. महेश खानझोडे, जनरल फिजिशियन डॉ. सागर बाजड आदी मान्यवरांची उपस्थिती होती. यावेळी बोलतांना " पत्रकार लोक सामाजिक संवेदनशीलतेने समाजासाठी सुद्धा एवढे सुंदर उपक्रम राबवितात हे इथे अनुभवायला मिळाले..! " असे भावोदगार मुख्याधिकारी सतीश शेवदा यांनी काढले.दरम्यान पत्रकारितेत अव्याहतपणे काम करणाऱ्या ज्येष्ठ पत्रकारांचा सत्कार करण्यात आला.तर शेतीनिष्ठ असलेल्या आदर्श शेतकऱ्यांचा देखील यावेळी हृदय सत्कार करण्यात आला आहे. शिवाय विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या सामाजिक कार्यकर्त्यांना सुद्धा सन्मानित करण्यात आले आहे. तर ज्या पत्रकारांनी पत्रकारितेसोबतच आपला पारंपारिक व्यवसाय सांभाळून आपल्या पाल्यांवर विशेष लक्ष देत, त्यांना शैक्षणिक क्षेत्रात उंच भरारी घेण्यासाठी बळ दिलं अशा नाविन्यपूर्ण पाल्यांचा




व त्यांच्या पत्रकार पालकांना मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले आहे. यावेळी सर्व पत्रकारांची आरोग्य व रक्त तपासणी देखील करण्यात आली असून, व्हाईस ऑफ मिडिया या संघटनेच्या वतीने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. नंतर ज्येष्ठ पत्रकार मोहनराव देशमुख, प्रभाकर पाटील, गजानन बानोरे, ताराचंद वर्मा, उद्धव जटाळे यांचा सत्कार करण्यात आला. यासह रिसोड येथील सदन कास्तकार विलास पाटील जाधव, अतुल पवार, यांना मान्यवराचे हस्ते सत्कार सन्मान करण्यात आला यासह शैक्षणिक क्षेत्रात उत्कृष्ट काम करणारे पत्रकार चे पाल्य यांचाही सत्कार करण्यात आला यामध्ये महादेवराव घुगे, सुरेश गिरी, वसंत पाटील खडसे, नरेंद्र अंभोरे यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला कार्यक्रमांतर्गत रिसोड शहरातील पाणीपुरवठा विभागाने अत्यंत कर्तव्यदक्ष कर्मचारी विनोद बांगर, शिवाजी शेलार, सामाजिक क्षेत्रात राहुल सर्वसामान्यांसाठी झटणारे शहरातील स्वच्छता असो व सामाजिक जातीय सलोख्यासाठी सदैव अग्रेसर राहणारे जमात ऐ इस्लामी हीचेद जिल्हाध्यक्ष शेख वकार यांच्यासह नगरसेवक कपील कदम यांना मान्यवरांच्या हस्ते सत्कार सन्मान करण्यात आला. यावेळी व्हाईस ऑफ मीडियाचे, राज्य कार्यकारिणी सदस्य अर्जुन खरात, विवेकानंद ठाकरे, संतोष चव्हाटे, तालुका अध्यक्ष विनोद बोडखे, तालुका, दीपक शेवाळे, जयंत वसमतकर, रवी अंभोरे, अनंत भालेराव, निनाद देशमुख, सतीश मांदळे, केशव गरकळ, अमर रासकर राहुल जुमरे काशिनाथ कोकाटे, गजानन गाडे, अनिकेत खरात, फिरोज शाह, प्रभाकर नाईकवाडे आधी पत्रकार उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन रुपेश बाजड यांनी केले तर आभार प्रदर्शन शेख अन्सारोद्दीन यांनी केले, कार्यक्रमाच्या यशस्वी साठी अजय जाधव, रणजितसिंह ठाकूर, महेंद्र महाजन, अमर कानडे, अजय कानडे आदी व्हाइस ऑफ मीडियाच्या सदस्यांनी अथक परिश्रम केले, शहरातील रांगोळी कलाकार प्रतीक्षा साबळे हिने पत्रकार कार्यालयाच्या प्रवेशद्वारावर व्हाईस ऑफ मीडियाच्या लोगोची अत्यंत आकर्षक व सुंदर रांगोळी काढून कार्यक्रमाला येणाऱ्याने ध्यान आकर्षण केले. तिच्या या रांगोळीचे कौतुकही मान्यवरांनी केले.

# चव्हाणांचा अंदाज

आधुनिक केसरी

भाजप अन्य राज्यात वाढण्यासारखी स्थिती नसल्याने महाराष्ट्रात भाजपचे अधिक लक्ष आहे. यंदाचे वर्ष हे निवडणुकीचे वर्ष असून देशाच्यादृष्टीने निर्णायक ठरणार आहे, असे मत माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी सोमवारी सांगलीत व्यक्त केले. शहर जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष पृथ्वीराज पाटील यांच्या निवासस्थानी आमदार चव्हाण यांनी आज माध्यमांशी संवाद साधला. यावेळी ते म्हणाले, अन्य राज्यात भाजपला अनुकूल स्थिती दिसत नाही. यामुळे महाराष्ट्रावर अधिक लक्ष केंद्रित करण्यात आले आहे. यातूनच प्रयोग सुरू झाले. पहिला प्रयोग शिवसेनेनवर आणि त्यानंतर राष्ट्रवादीवर करण्यात आला. यापुढील काळातही असे प्रयोग थांबतील असे वाटत नाही. पक्षातून नेते बाहेर पडले ते वैयक्तिक स्वार्थासाठीच. जनतेला मूळ पक्षाशी नेत्यांनी केलेली गद्दारी आवडली नाही. फितुरी महाराष्ट्रातील जनता कधीही मान्य करत नाही. आमदार अपात्र प्रकरणी सध्या विधानसभा अध्यक्षांसमोर सुनावणी सुरू असून अध्यक्षांना कायद्यानुसार निर्णय घ्यावा लागणार आहे. तसे जर झाले नाही तर सर्वोच्च न्यायालयाची काय भूमिका घेणार हे पाहायला हवे. विधानसभेचे अध्यक्ष नार्वेकर निर्णय घेतील तो पहिला भूकंप असेल. पक्षांतर बंदी कायदा हा कुचकामी असून तो कचऱ्याच्या डब्यात फेकून द्यायला हवा. राममंदिर हे केवळ भाजपचे नाही तर तमाम रामभक्तांचे आहे.यामुळे याचा लोकसभा निवडणुकीवर काही परिणाम होईल असे वाटत नाही. लोकसभेवेळी मतदान महागाईच्या मुद्द्यावर होईल, असेही त्यांनी सांगितले. लोकसभा निवडणुकीवेळी अधिकाधिक उमेदवार उभे करून मत विभाजन करण्याची रणनीती भाजपकडून आखली जाईल. मत विभाजन टाळण्याचा इंडियाचा प्रयत्न असून बहुजन वंचित आघाडीनेही इंडिया आघाडीत सहभागी व्हावे असे आपले मत असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. जर नरेंद्र मोदी तिसऱ्यांदा पंतप्रधान झाले तर देशाची घटनाच बदलली जाण्याची भीती व्ययत केली जात आहे. यासाठी मतदारांनीही आता कोणत्याही भूलथापांना बळी न पडता मतदान करण्याची गरज आहे, असेही आमदार चव्हाण यावेळी म्हणाले.



मच्छिंद्र ऐनापुरे
जत, जि. सांगली

# देशातील वाहनांची वाढती संख्या चिंताजनक

आधुनिक केसरी

**आपल्या देशात काही वर्षांपासून लोकसंख्येच्या प्रमाणात मोठ्या शहरात तसेच महानगरांमध्ये वाहनांची संख्या तितक्याच प्रमाणात दिवसेंदिवस वेगाने वाढत आहे. प्रत्येक शहरात अपुरे रस्ते आणि पार्किंगची सोय पुरेशी उपलब्ध नसल्यामुळे माणसांपेक्षाही जास्त जागा व्यापणाऱ्या या वाहन समस्येवर कुठले उपाय शोधायचे, असा मोठा प्रश्न सरकार समोर निर्माण झाला आहे. एकीकडे स्मार्ट सिटी आणि खेड्यांच्या विकास सरकारी स्तरावर होत आहे. आज नागरिकरणाची आवश्यकता जरी असली तरी लोकसंख्येच्या प्रमाणामध्ये तिथल्या सोयीसुविधांचादेखील गंभीरपणे विचार करण्याची गरज आहे.**

आज देशाची लोकसंख्या 140 कोटींच्यावर गेलेली आहे; पण त्या प्रमाणात विशेषकरून महानगरात कोटींच्यावर वाहनांची संख्या गेली आहे; पण पुरेसे रस्ते आणि पार्किंगची सोय उपलब्ध नाही. जी भविष्यात अतिशय चिंतेची बाब ठरणार असल्याचे चित्र दिसते. याकरिता वाहन संख्येवर मर्यादा आणण्याशिवाय दुसरा पर्याय उरलेला नाही.

भारत आता जगाचा विचार करता दुचाक्यांच्या बाबतीत अग्रक्रमांकावर जाऊन बसला आहे. त्यानंतर क्रमांक लागतो तो इंडोनेशियाचा. प्रवासी कार्सच्या विभागात आपण आठव्या क्रमांकावर असून चीन, अमेरिका नि जपान हे पहिल्या तीन क्रमांकांचे मानकरी आहेत. सर्व राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशांत मिळून २०२० मध्ये भारतात ३२.६३ कोटी वाहनं आणि त्यापैकी जवळपास ७५ टक्के दुचाकी वाहनं होती. गेल्या तीन वर्षांत दोन कोटींहून अधिक वाहनांची नोंदणी झाली असून २०२३च्या जुलैपर्यंत एकूण संख्या पोहोचली होती ३४.८ कोटींच्या घरात. सरकारी आकडेवारीनुसार, जुलै, २०२३ पर्यंत सर्वाधिक नोंदणीकृत वाहनं होती ती महाराष्ट्रात (३.७८ कोटी). त्यानंतर उत्तर प्रदेश (३.४९ कोटी) आणि तामिळनाडू चा (३.२१ कोटी) क्रमांक लागला होता. १० लाखांहून अधिक लोकसंख्या असलेल्या शहरांमध्ये दिल्ली जवळपास १.३२ कोटी नोंदणीकृत वाहनांसह पहिल्या, तर बेंगळूर दुसऱ्या स्थानावर आहे. मुंबईतील दुचाक्यांची संख्या मागील वर्षातील आकडेवारीनुसार २७ लाखांवर पोहोचली आहे. ही घनता प्रति किलोमीटर १ हजार ३५० इतकी असून देशाचा विचार करता हे प्रमाण सर्वाधिक आहे. शहरांतील घनतेच्या बाबतीत दुसऱ्या क्रमांकावर विसावलंय ते २४.५ लाख दुचाकी वाहनांसह पुणे शहर. सदर प्रमाण प्रति किलोमीटर १ हजार ११२ दुचाक्या इतके. त्या तुलनेत चेन्नई, बेंगळूर, दिल्ली आणि कोलकाता येथील घनता प्रति १ हजारापेक्षा कमी आहे. गेल्या वर्षी ३० सप्टेंबरपर्यंत बेंगळूरमध्ये एकूण १.१ कोटी वाहने होती. शहरातील वाहनांच्या संख्येनं २०१२-१३ मधील ५५.२ लाखांवरून ही झेप घेतली. याच कालावधीत कर्नाटकातील नोंदणीकृत वाहनांची संख्या जवळपास १.५ वरून उड्डाण करून ३ कोटींहून अधिक झाली. गोवा हे छोटेसे राज्य असले तरी अनेक बाबतींत आघाडीवर असून त्यापैकी एक म्हणजे प्रत्येक घरामागं दुचाक्या नि कार्सच्या मालकीचं प्रमाण! राष्ट्रीय कुटुंब आरोग्य सर्वेक्षणानुसार , सर्व भारतीय कुटुंबांपैकी ७.११ कुटुंबांकडे चारचाकी वाहनं, तर ४९.५७ टक्के कुटुंबांकडे दुचाकी आहे. मात्र गोव्यातील ४५.२ टकके कुटुंबांच्या दारात कार, तर ८६.५७ टक्के कुटुंबांच्या घरासमोर दुचाकी दिसते. चारचाकी वाहनांच्या बाबतीत २४.२ टक्क्यांसह केरळ, तर दुचाक्यांचा विचार करता ७५.६ टक्क्यांसह पंजाब दुसऱ्या क्रमांकावर आहे. भारतातील महानगरांचा विचार करता कार्सचं सर्वाधिक प्रमाण (किलोमीटरमागं घनता) दिसून येतं ते पश्चिम बंगालची राजधानी असलेल्या कोलकाता शहरात. हा आकडा प्रति किलोमीटर २ हजार ४४८ इतका मोठा आहे. या पार्श्वभूमीवर रहदारी मोठ्या प्रमाणात वाढल्यामुळं या शहरातील प्रवास आता जास्त वेळ खाऊ झाला आहे. गेल्या पाच वर्षांत एका फेरीसाठी लागणाऱ्या वेळेत दुप्पट वाढ झाली आहे. कोलकात्यात आता जवळपास ४५.३ लाख वाहनं रस्त्यांच्या १ हजार ८५० किलोमीटर क्षेत्रातून धावताना दिसतात. दिल्लीत जरी त्याहून जास्त वाहनं ( १ कोटी ३२ लाख) असली, तरी तेथील रस्त्यांचं क्षेत्र हे कोलकाताहून तिप्पट म्हणजे ३३ हजार १९८ किलोमीटर इतकं आहे. यामुळं देशाच्या राजधानीतील घनता प्रति किलोमीटर ४०० पेक्षा कमी आहे. सध्या कोलकात्यात ६.५ लाख दूचाक्या आहेत.



कोरोना काळानंतर भारतात मोठ्या प्रमाणात वाहन खरेदी वाढली आहे हे खरे आहे. तिथूनच वाहन खरेदीचा सपाटा लागला आहे. सध्या भारतात वाहन क्षेत्राला विलक्षण तेजी आली आहे. भारतीयांच्या खिशात खुळखुळणारा पैसा, बदलत्या परिस्थितीनुसार पदरी दुचाकी वा कार असण्याची वाढती गरज, युवावर्गाची नि धनिकांची महागड्या वाहनांची 'क्रेझ' यामुळं दिमाखात दारापुढे वाहन झळकणाऱ्या घरांची संख्या वधारत चालली आहे. त्यामुळे रस्त्यांवर माणसं कमी नि वाहनं जास्त असं चित्र उभं राहू लागलेलं असून त्यातूनच वाट काढत जायचं कसं हा प्रश्न उपस्थित होऊ लागला आहे. मात्र उद्याच्या भारतासाठी हे धोकादायक आहे. प्रदूषणाने सध्या कळस गाठला आहे. त्यामुळे आता उलटी गिणती करण्याची वेळ आली आहे. सार्वजनिक वाहनांचा वापर वाढवण्याची आणि त्याला प्रोत्साहन देण्याची गरज निर्माण झाली आहे. वैयक्तिक वाहनांची संख्या वाढू नये यासाठी नियमावली आवश्यक आहे.

वाहन हे गरज म्हणून घेतले जाते की, आपल्याकडे असलेल्या पैशाचे किंवा श्रीमंतीचे प्रदर्शन माडण्यासाठी घेतले जाते याचादेखील विचार करण्याची वेळ आली आहे. माझ्याकडे पैसा आहे म्हणून मी चार चार, पाच पाच वाहने घेईन आणि जो त्याच पैशामुळे एकही वाहन होऊ शकत नाही अशा सामान्य माणसाला चालण्यासाठीदेखील जागा मिळणार नाही, असे जर त्याचे प्रमाण होत असेल तर वाढती वाहने ही सुविधा ठरण्याऐवजी एक मोठी समस्याच म्हणावी लागेल. यावर पर्यायी उपाय म्हणून केंद्रीय परिवहन विभागाचे उपाययोजना म्हणून एखाद्याकडे एक वाहन असताना दुसरे वाहन घेतले तर त्या दुसऱ्या वाहनावर शंभर टक्के जास्तीचा कर आकारण्याचे सुचविले आहे. तसेच ज्यांच्याकडे वाहन ठेवण्याची व्यवस्था आहे. त्यांनाच वाहन घेण्याची परवानगी दिली जावी, असे सरकारकडे सुचविले आहे. परंतु आपल्या देशात नियमांमधून पळवाटा काढणाऱ्यांची संख्या आज कमी नाही. दुसरे वाहन खरेदी करताना घरातल्याच दुसऱ्याच्या नावावर दाखविल्यापासून बनवेगिरी केली जाऊ शकते. परंतु या सगळ्या शक्यता लक्षात घेऊन मोठया शहरांमध्ये वाढणारी वाहने कोणत्याही परिस्थितीत नियंत्रणात आणावी लागतील आणि त्याकरिता प्रत्येक कुटुंबाकडे एक वाहन हेच तत्व राबवावे लागेल. त्यासाठी आधार कार्ड किंवा पॅन कार्डचा पुरावा आणि स्वतःचे स्वतंत्र घर असल्यास ते जास्त फायदेशीर ठरेल, असे वाटते.

आज देशातील दिल्ली, बेंगळुरू, मुंबई ही मोठी शहरे वाहनांमुळे इतकी फुगली आहेत की रोजचा शहरातल्या शहरात होणारा एकूण प्रवास हा तीन ते चार तास वेळ घेत आहे. शहरांचे नियोजन करताना रस्त्याचे नियोजन योग्य पद्धतीने होणे महत्त्वाचे ठरते. ज्याची मोठी कमतरता सर्व मोठया शहरांमध्ये दिसते. यापुढे प्रत्येक गृहसंकुलामध्ये पार्किंगची व्यवस्था तसेच प्रत्येक गृहसंकुलांच्या मागे शंभर फुट रस्त्याचे नियोजन आणि त्याच्यापुढे असलेल्या गृहसंकुलाच्या पटीत चौपदरी रस्त्याची बाधणी, अशी नवी विकास नियमावली अंमलात आणण्याची गरज आहे. नव्या शहरांचे नियोजन करताना प्रत्येक घरी दोन ते चार वाहने गृहीत धरून रस्त्याचा आकार आणि प्रमाण निश्चित करावे लागेल. विशेषतः स्मार्ट सिटीची कल्पना राबवताना ज्याला आपण पायाभूत सुविधा म्हणतो त्या रस्त्यांना अधिक महत्त्व देण्याची गरज आहे. रस्ते, पाणी, वीज या मूलभूत सोयींचा विचार करताना त्याच्या प्रमाणाची किंवा पूर्ततेची नवी व्याख्या ठरविण्याची वेळ आली आहे, असे वाटते.

पाणी किंवा विजेचे नियोजन करताना थोडाफार वाव मिळू शकतो परंतु एकदा शहरांची बांधणी झाली तर नव्याने रस्ते तयार करणे शक्य होत नाही आणि म्हणून आधी रस्ते आणि मग गृहसंकुले याप्रमाणे असा वेगळा विचार करण्याची वेळ केंद्र व राज्य सरकार यांच्यावर आलेली आहे. या आगोदर जशी जागा उपलब्ध होईल तशी रस्त्याची सोयीप्रमाणे जोडणी केली जायची आणि मग गृहसंकुले बांधली जायची; पण आता बदलत्या परिस्थितीमध्ये शहराच्या किंवा अगदी लहान गावांचा विकास आराखड्यांमध्ये या गोष्टींना विशेष प्राधान्य दिल्यास ते जास्त फायदेशीर ठरू शकेल. कारण शेवटी औद्योगिक किंवा आर्थिक विकासाचे गणित मांडताना दळणवळणाच्या सोयीसुद्धा विचार करताना त्याठी रस्ते मोठे असणे आणि भविष्यातील वाहन संख्येला सामावून होणारे असायला पाहिजे. तरच देशातील तसेच राज्यातील वाढती वाहन समस्या नक्कीच काही प्रमाणात सुटू शकेल यात शंका नाही.



गणेश खाडे
संपर्क क्र. 9011634301

# संयमाची साधना प्रयत्नाला यशात परिवर्तित करते

आधुनिक केसरी

**प्रयत्नाला यशात परिवर्तित करण्यासाठी संयम हाच निर्णयक ठरतो. उतावीळ पणा असंयम हे यशाच्या मार्गावरील मुख्य शत्रू आहेत असं म्हटलं तरी वावगं ठरणार नाही.जितका संयम जास्त तितकीच यशस्वी होण्याची शक्यता जास्त असते. अंसयमित वृत्ती आणि उतावीळ पणा हे जीवनात अनेक समस्यांना जन्म घालत असतात. सृष्टीवरील कोणत्याही प्रकारच्या यशाला गवसणी घालण्यासाठी संयम हा उत्कृष्ट गुण असून तो आपण जीवनात अंगिकारलाच पाहिजे. संयमाची पराकाष्ठा हि यशाची जननी आहे. हे विसरून चालणार नाही. दैनंदिन जीवनात विविध क्षेत्रात यश मिळविण्यासाठी आपण प्रयत्न करत असतो. हाच प्रयत्न यशात परिवर्तित होण्यासाठी संयम महत्वपूर्ण भुमिका निभावत असतो.**

मानवी जीवनात वेगवेगळ्या गुणांचा अवगुणांच वेगवेगळ महत्व असलं तरी देखील यश मार्गावर संयम सहनशीलता हाच कठीण पण अदभुत गुण आहे.जीवन म्हटलं की यश अपयश हे वाट्याला येणारच.संकटा वादळ पेलत असताना यत्किंचितही डळमळित न होता आपण आपला संयम टिकवून ठेवण्यात यशस्वी झालो तर यश आपल्या पासून कोणालाही हिरावून घेता येऊ शकत नाही.जीवनात अनेक आपल्या मनाविरुद्ध घटनाक्रम घडामोडी घडत असतात अशा वेळी न थकता न घाबरता अगदी स्थैर्य पुर्वक सगळ्या घटनांना सामोरे जाण्या मध्ये आपण जर यशस्वी झालो.तर आपण करत असलेले प्रयत्न निश्चितच यशात परिवर्तित झाल्याशिवाय राहणार नाहीत. जीवनात संयम बाळगला तर नक्कीच आपण यशाच्या शिखरापर्यंत पोहचणार या मध्ये शंका नाही आपलं यश अपयश हे मुख्यत्वे सहनशीलतेवर अवलंबून असतं.जीवनात विविध अशा , अपेक्षा, महत्वकांक्षा यांच वझ घेऊन आपण जीवन जगत असतो.आणि या मध्ये काही अपेक्षा महत्त्वाकांक्षा पुर्ण होण्यासाठी आपल्यला खुप खडतर संघर्ष देखिल करावा लागतो. त्या सोबतच अनेक समस्यांना देखिल सामोरे जावा लागत.कठिण प्रसंगातून सावरणं गरजेचं असतं पण सावरण्यासाठी पराकोटीचा संयम अपेक्षित असतो.आपल्या कडे एक मन सर्व श्रुत आहे पाण्याची सुद्धा चाळणी मध्ये साठवण होऊ शकते. परंतु त्या साठी पाण्याचा बर्फ होई पर्यंत संयम ठेवला पाहिजे तरच हे शक्य आहे.आणि सध्याच जग तर प्रचंड उतावीळ असंयमित अस्थिर आहे.आणि याच



उतावीळ पणामुळे अनेक बाबतीत आपलं जीवनात नुकसान सुद्धा होत असतं.सर्वगुणसंपन्न असुनही जवळपास पन्नास ते साठ टक्के लोक आपल्या धेय्य पर्यन्त पोहचत असताना संयमाचा अभाव असल्यामुळे अति प्रचंड मेहनत करून सुद्धां त्या योग्य परिणामांना गवसणी घालू शकत नाहीत. हाती आलेल यश सुद्धा आवश्यक असणारी सहनशीलता न बाळगल्या मुळ संपुष्टात येऊन आपण पुन्हा शुन्यावर येण्याची स्थिती उद्भवते.आणि या सगळ्या गोष्टींना आपली संयम वृत्ती कारणीभूत असते. आपण आपल्या जीवनाशी निगडित एक अंतिम असं धेय्य निश्चित करून मार्गक्रमण करत असतो. हेच अंतिम धेय्य पुर्ण करण्यासाठी आपण आपल्या संपूर्ण ताकदीनिशी प्रयत्न करत असतो.प्रयत्नाला संयमाची जोड लागली तर अशक्य देखील शक्य होत. सर्वसाधारण पणे आपण आपल्या आजूबाजूला असणार्या जगाचं अवलोकन केले तर एक गोष्ट प्रकर्षाने आपल्या लक्षात येते.जीवनाच्या पटलावर यश सगळ्यांनाच अपेक्षित असत.पण संयम नसल्या कारणाने तिथं पर्यंत पोहचता येत नाही. यशस्वी होण्यासाठी संयमाची साधना यशस्वी झाली पाहिजे. यश मार्गावरील मोठा अडथळा असंयम उतावीळ पणा हाच आहे आणि हिच मुख्य अडचण समजली तर यश मार्गावर अडथळा उरत नाही.अनेकदा संयमाची साधना खंडीत झाल्यामुळे मुळे आपण आपल्या जीवनातील अंतिम ध्येया पासून वंचित राहतो.यशाला हमखास गवसणी घालण्यासाठी संयमाची साधना यशस्वी झाली पाहिजे.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. ( * पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# वसंत मुंडेंचा वृत्तपत्रांच्या अर्थकारणाचा अजेंडा विधानसभेत मांडणार

## आमदार संदीप क्षीरसागर यांची दर्पणदिनी ग्वाही : बीड ही वृत्तपत्रांची पंढरी : प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे

आधुनिक केसरी न्यूज

**बीड :** महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाच्या माध्यमातून प्रदेशाध्यक्ष वसंतराव मुंडे हे वृत्तपत्रांचे अर्थकारण पोटतिडकिने मांडत आहेत. छोटी वृत्तपत्रे आणि पत्रकारांचे प्रश्नांच्या अर्थकारणाचा अजेंडा विधानसभेत मांडणार असल्याची ग्वाही बीडचे आमदार संदीप क्षीरसागर यांनी दिली. तर बीडच्या पत्रकारितेने राज्यात आपली वेगळी ओळख निर्माण केली असून बीड ही खऱ्या अर्थाने वृत्तपत्रांची पंढरी आहे, स्थानिक वृत्तपत्र लोकांची प्रश्न लोकांच्या भाषेत मांडतात त्यामुळे वृत्तपत्रांना लोकाश्रय असल्याने ते टिकून आहेत.अशा शब्दांत कार्यक्रमाचे अध्यक्ष तथा पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे यांनी बीडच्या पत्रकारितेचा गौरव केला.

महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ, मुंबईच्या बीड जिल्हा शाखेच्या वतीने शनिवार, ६ जानेवारी २०२४ रोजी दर्पण दिनानिमित्त बीड येथील स.मा.गर्गे भवन येथे कर्तृत्ववान पत्रकारांचा गौरव करण्यात आला.

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबईचे प्रदेशाध्यक्ष वसंतराव मुंडे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या सोहळ्याला बीडचे आमदार संदीप क्षीरसागर, माजी आमदार उषाताई दराडे, उपविभागीय अधिकारी करिष्मा नायर, अतिरिक्त पोलीस अधीक्षक सचिन पांडकर, संपादक संतोष मानूरकर, आदींची उपस्थिती होती. आमदार संदीप क्षीरसागर म्हणाले, बीडची पत्रकारिता निर्भीड असून ती डोळ्यात अंजन घालणारी आहे. वृत्तपत्रांचे अर्थकारण आणि पत्रकारांच्या इतर मागण्या तडीस नेण्यासाठी विधानसभेत आवाज उठवू अशी ग्वाही त्यांनी दिली दिली. अध्यक्षीय भाषणात प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे म्हणाले, बीडच्या प्रगल्भ पत्रकारितेला मोठा वारसा आहे. बीडच्या पत्रकारितेला केवळ लोकाश्रय असल्यामुळेच ती निर्भीड झाली आहे, बीड ही खऱ्या अर्थाने वृत्तपत्रांची पंढरी आहे. स्थानिक वर्तमानपत्र आणि काम करणाऱ्या संपादक पत्रकारांचे वेगवेगळे वैशिष्ट्य आहेत. इथली वर्तमानपत्र लोकांचे प्रश्न लोकांच्या भाषेत मांडतात इथं कोणतीही बातमी विषय जपला जाऊ शकत नाही त्यामुळे वर्तमानपत्रांना लोकाश्रय आहे असे मत व्यक्त केले. तर वृत्तपत्रात येणाऱ्या सकारात्मक आणि नकारात्मक अशा दोन्ही बातम्यांकडे प्रशासन म्हणून आम्ही बारकाने लक्ष ठेवतो, त्यामुळे सर्वसामान्यांना न्याय मिळण्यासाठी वृत्तपत्र हे प्रमुख माध्यम ठरते, असे उपविभागीय अधिकारी करिष्मा नायर यांनी सांगितले. प्रस्ताविक संपादक संतोष मानुरकर तर सुत्रसंचालन पत्रकार संघाचे मराठवाडा विभागीय अध्यक्ष वैभव स्वामी यांनी केले. सर्वोत्तम गावस्कर, नरेंद्र कांकरिया, विलास तोकले, काझी मगदूम, आदींनीही आपले मनोगत मांडले.




या शानदार पुरस्कार सोहळ्यास आणि दर्पण दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमास ज्येष्ठ पत्रकार अशोक देशमुख, सुर्योदयचे संपादक गंगाधर काळकुटे, आरोग्यदूतचे संपादक बाबा श्रीहरी देशमाने, पत्रकार संघाचे पदाधिकाऱ्यांसह बीड जिल्ह्यातील पत्रकार बांधव,भगिनी, नागरिक यांनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**या दिग्गज बीडकरांचा झाला दर्पण दिनी गौरव :** दर्पण दिनानिमित्त बाळशास्त्री जांभेकर बीडचे दर्पणकार या नामांकित पुरस्काराने बीडचे भूषण म्हणून पश्चिम भारताचे पीटीआय प्रमुख विलास तोकले, मराठी दर्पणकार म्हणून सुराज्यचे संपादक सर्वोत्तम गावस्कर, उर्दू दर्पणकार दैनिक तामिरचे संपादक मकदूम काझी, इंग्रजी दर्पणकार म्हणून लोकमत टाइम्सचे जिल्हा प्रतिनिधी सी . आर . पटेल, हिंदी दर्पणकार दैनिक लोकमतचे उपसंपादक अनिल भंडारी, इलेक्ट्रॉनिक मीडिया दर्पणकार म्हणून टीव्ही 9 चे महेंद्र मुधोळकर, न्यूजपोर्टल सोशल मीडिया दर्पणकार संग्राम धनवे, युट्युब सोशल मीडिया दर्पणकार संतोष ढाकणे आणि अब्दुल कलाम वैचारिकदूत पुरस्काराचे मानकरी आष्टी येथील ज्येष्ठ वृत्तपत्र विक्रेते भीमराव गुरव या दिग्गज बीडकरांचा यथोचित सन्मान करण्यात आला .

# दहा रुपयांचे नाणे अधिकृतच : चव्हाण

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यात व सावळदबारा परिसरात काही शाखाधिकारी, शासकीय बँका, खाजगी बँका, सहकारी बँका १० रुपयांचे नाणे व्यवहार करण्यासाठी स्विकारत नसल्याच्या तक्रारीचे प्रमाण वाढत आहे. काही ठिकाणी दुकानदार, विक्रेते १० रुपयांचे नाणे स्विकारण्यास नकार देत आहेत. रिझर्व बँकेच्या नियमाप्रमाणे प्रचलीत असलेले नाणे न स्विकारणे हा गुन्हा असून हे नाणे स्विकारण्यास नकार देणारे विक्रेते, संबंधीत व्यक्ती यांच्या विरुध्द कायदेशीर कारवाई केली जाईल, अशी माहिती सोयगाव पंचायत समितीचे माजी सभापती धरमसिंग चव्हाण यांनी दिली आहे. भारतीय रिझर्व बँक टाकसाळीत तयार केलेली नाणी प्रस्तृत करते,नाण्यांवर निरनिराळी आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक मूल्ये दर्शविणारी स्पष्ट लक्षणे असून, ती नाणी वेळोवेळी प्रसृत केली जातात. नाण्यांचे आयुष्य दीर्घकालिन असल्याने, निरनिराळया डिझाईन्सची व मूल्याची नाणी एकाच वेळी परिवलित होत असतात. रिझर्व बँकेने आतापर्यंत १४ डिझाईन्समधील १० रुपयांची नाणी दिली आहेत. त्यांच्या स्पष्ट लक्षणांबाबत जनतेला वृत्तपत्र निवेदनामार्फत कळविण्यात आले आहे. ही सर्व नाणी वैध चलनात आहेत. सर्व शाखाधिकारी, शासकीय बँका, खाजगी बँका, सहकारी बँका, व्यापारी विक्रेते यांनी १० रुपयांच्या नाण्यांच्या वापराबाबतचा गैरसमज दूर केला पाहिजे. याचबरोबर बँकानी आपल्या शाखेच्या बाहेर बॅनर, लिफलेट, फिरत्या वाहनावरुन याबाबत जनजागृती करावी, अशी माहिती माजी सभापती धरमसिंग चव्हाण यांनी दिली आहे.बँकांनी ग्रामीण भागातील यंत्रणाचा पुरेपुर वापर करुन नागरिकांपर्यंत हा संदेश पोहोचवावा,असे मत माजी सभापती धरमसिंग चव्हाण त्यांनी स्पष्ट केले.

# वाईट प्रवृत्तींना वेळीच ठेचले पाहिजे : रामदास कांबळे

आधुनिक केसरी न्यूज

**सुशिल गायकवाड**

**लोणंद :** ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंती दिनी नायगाव, ता.खंडाळा येथे महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले यांच्या पुतळ्याला काहींकडून दुग्धाभिषेक घालण्यात आला होता. त्यामुळे समाजमनाच्या भावना दुखावल्या गेल्या होत्या. ज्या मानसिकतेतून हा दुग्धाभिषेक करण्यात आला. त्या मानसिकतेचा विविध समाजातील लोकांनी तीव्र शब्दांत निषेध व्यक्त केला.नायगांव येथे विविध समाजातील लोकं तसेच विविध पक्षातील राजकीय नेते मंडळी एकत्र यांनी सुद्धा या घटनेबद्दल आपल्या भावना व्यक्त केल्या.यावेळी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे या पक्षाचे सातारा जिल्हा समन्वयक रामदास कांबळे यांनी सुद्धा परखडपणे भूमिका मांडल्या.वाईट प्रवृत्तीना एकत्र येऊन वेळीच ठेचलं पाहिजे.असं कृत्ये घडू नये ही खबरदारी सर्वांनी घ्यावी.असा सूर रामदास कांबळे यांनी मांडला.यावेळी मोठ्या संख्येने लोकं उपस्थित होते.



रामदास कांबळे म्हणाले की,ही घेतलेली सभा कुठल्या आनंदात घेतलेली सभा नाही. आपल्या महापुरुषांची झालेली विटंबना ज्या कोणी समाजकंटकांनी,त्या समाजकंटकांचं कोणी नांव घेता कामा नये.या तालुक्यात सर्व जाती धर्माची मंडळी चांगल्या सलोख्याने आपण राहत असतो.या तालुक्यात अशा प्रकारे कुठलाही अनुचित प्रकार घडला नव्हता.जेव्हा या तालुक्याचा कधी इतिहास लिहिला जाईल. तेव्हा मात्र जी समाजविघातक,समाजकंटक आहेत.त्या मंडळीचे नांव प्रसिद्ध केलं जाईल. आपल्याला कुणाला दोष द्यायचा नाही.३ जानेवारीला सावित्रीमाई फुले आणि महात्मा फुले यांना अभिवादन करण्यासाठी महाराष्ट्रच नव्हे तर बाहेरील प्रदेशातून लोकं अभिवादन करण्यासाठी येत असतात.आपल्याला आपल्या तालुक्याची शांतता अजिबात भंग करायची नाही. आपण शांतता प्रिय मंडळी आहोत.परंतु मी एवढं ही सांगेन डॉ.बाबासाहेब आंबेडकर म्हटले होते की अन्याय करणाऱ्यापेक्षा अन्याय सहन करणारा मोठा गुन्हेगार आहे.असे सुध्दा रामदास कांबळे यांनी म्हटले.

पुढे रामदास कांबळे म्हणाले की,आपल्याला अन्याय अजिबात सहन करायचा नाही.आपल्या हातामध्ये लेखणीची ताकत आहे.फक्त भांडण मारामारी करणं यातून कुठलाही मार्ग निघत नसतो.ज्या दोन समाज कंटाकांनी हे जे कृत्ये केलं.खरंतर त्यांची बौध्दिकता ज्या महात्मा फुले आणि सावित्रीमाईंनी कर्मकांडांना विरोध करण्यासाठी आपलं अख्ख्य आयुष्य त्यागलं. समाजकंटकांनी येऊन पुन्हा एकदा तेच कर्मकांड करण्याचं प्रयत्न केला.ते म्हणत होते आम्ही वैचारिक विरोध करत होतो.कीव येते अशा वक्तव्याची त्यांनी वैचारिक विषयाचा शब्द सुद्धा त्यांच्या तोंडातून आला नाही पाहिजे. म्हणून त्या समाज कंटकांचा उल्लेख करू नये. त्यांनी केलेला तो एक स्टंट होता.स्टंट करुन प्रसिद्धी मिळविण्याचा प्रयत्न होता.परंतू वाईट मार्गाच्या प्रसिध्दीला सुद्धा काळीमा फासणारं कृत्ये समाजकंटकाच्या हातून घडलेलं आहे. कोणत्याही समाजविघातक प्रवृत्तींना पाठींबा न देता वैचारिक मार्गाने बहुजन समाजाची एकी ठेवायची आहे. तालुक्यात कुठल्याही समाजाचा प्रश्न निर्माण होत नव्हता.वाईट प्रवृत्तीना आपण एकत्र येऊन वेळीच ठेचलं पाहिजे.असा इशारा सुद्धा रामदास कांबळे यांनी या सभेतून दिला. महापुरुषांबद्दल सांगत असताना रामदास कांबळे म्हणाले की,शाहु फुले आंबेडकर, अहिल्याबाई होळकर,अण्णाभाऊ साठे छत्रपती शिवाजी महाराज या कुठल्यातच महापुरुषाने कुठल्याच व्यक्तिगत समाजासाठी काम केलं नाही.तर सर्वच घटकांसाठी समनतेचा संदेश देणारे काम केलेलं आहे.सर्वांच्या उत्कर्षाच्या,

प्रगतीचा मार्ग हा महापुरुषांनी दिलेला आहे.या सर्व महापुरुषांना व त्यांच्या विचारांना मानणारे आपण कार्यकर्ते आहोत.ही प्रत्येकाने मनाशी खुणगाठ बांधली पाहिजे.तालुक्यातच नव्हे तर महाराष्ट्रामध्ये पुन्हा असं कृत्ये घडू नये ही सर्वांनी खबरदारी घ्यावी.यापुढे ही आपला वैचारिक लढा, महापुरुषांच्या विचारांचा ज्योत कायम तेवत ठेवुयात.अशी प्रेरणा घेण्यास ही रामदास कांबळे यांनी सांगितले.

# पत्रकार दिनाचा राजकारण्यांना आणि प्रशासकीय यंत्रणेला पडला विसर

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील सावळदबारा व परिसरात समाजाचे प्रबोधन व्हावे या उद्देशाने बाळशास्त्री जांभेकर यांनी ६ जानेवारी इ.स.१८३२ रोजी दर्पण नावाचे मराठीतील पहिले वृत्तपत्र सुरू केले.त्या दिवसांची आठवण म्हणून ६ जानेवारी हा दिवस महाराष्ट्रात मराठी पत्रकार दिन म्हणून मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येतो आजही जिल्ह्यात व पत्रकार दि मोठ्या उत्साहात साजरा झाला परंतु सावळदबारा व परिसरात पत्रकार दिनाचा राजकारण्यांना आणि प्रशासकीय यंत्रणेला विसर पडल्याचे दिसून आले.आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांनी जानेवारी 1832 रोजी पहिले दर्पण नावाचे मराठी वृत्तपत्र इंग्रज राजवटीमध्ये सुरू केले. म्हणून सहा जानेवारी हा दिवस संपूर्ण महाराष्ट्र राज्यामध्ये पत्रकार दीन म्हणून साजरा करण्यात येतो. तसेच लोकशाहीच्या तीन स्तंभ म्हणजेच शासन, प्रशासन, न्याय व्यवस्था, आणि चौथा स्तंभ म्हणजेच पत्रकारांना मानल्या जाते. या मधे पत्रकार हा चौथा स्तंभ चोवीस तास अहोरात्र समाजातील प्रत्येक घटकाला न्याय मिळवून देण्यासाठी सतत झटत असतो.लोकशाहीच्या तिन्ही स्तंभाकडून ज्या वेळेस एखाद्या बाबीसाठी, न्याय मिळत नाही तेव्हा मात्र समाजाला हा चौथा स्तंभ असलेला पत्रकार न्याय मिळवून देत असतो. यासाठी पत्रकारांना कोणत्याही प्रकारचे आर्थिक, मानधन मिळत नाही. तसेच इंग्रज राजवटीपासून आजही पत्रकार हा मात्र उपेक्षितच राहिला आहे. आज दिनांक 6 जानेवारी 2024 रोजी असलेल्या पत्रकार दिनाचा सावळदबारा सर्वच प्रशासकीय कार्यालयातील अधिकारी, तसेच सावळदबारा परिसरातील राजकारणी जे पत्रकारांनी प्रसिद्ध केलेल्या बातम्यांच्या आधारे आपली राजकीय पोळी भाजण्याचा प्रामाणिक प्रयत्न करीत असतात. मात्र सोयगाव तालुक्यातील विद्यमान, आमदार, खासदार, तसेच इतर स्थानिक स्वराज्य संस्थांतील पदाधिकारी यांना मात्र पत्रकार दिनाचा विसर पडला आहे.परिसरातील एकाही राजकारण्यांने पत्रकार दिनानिमित्ताने साध्या शुभेच्या ही दिल्या नसल्याने सावळदबारा परिसरात सर्व पत्रकार बांधवांमध्ये तीव्र नाराजीचा सुर उमटला. मात्र समाजासाठी झटणारा पत्रकार हा घटक नेहमीच उपेक्षित असून पत्रकार हा घटक समाजाकडून किमान सन्मान तरी मिळावा एवढ्याच अपेक्षेत आहे.



# रक्तदान शिबिरात ११६ रक्तदात्यांचे रक्तदान

आधुनिक केसरी न्यूज

**उरण :** ८ ऑगस्ट २०१८ रोजी सी.एच.ए ( कस्टम हाऊस एजन्ट ) बांधवांच्या हितासाठी स्थापन झालेल्या न्हावा शेवा सी.एच.ए संघटनेच्या वतीने आजवर अपघाती निधन झालेल्या आणि अपघातात जखमी झालेल्या सी.एच.ए बांधवांना आणि त्यांच्या कुटुंबियांना साडे आठ लाखाहून अधिक निधीचे वाटप झाले आहे, नवीन संकल्पना म्हणून सी.एच.ए बांधवांच्या व्यतिरिक्त कोणत्याही व्यक्तीचा अपघाती मृत्यू झाल्यास त्याच्या कुटुंबियांना देखील प्रति कुटुंब १० हजार अश्या मदतीच्या माध्यमातून आजवर ४०,००० मदत निधीचे वाटप झाले आहे.

सध्या न्हावा शेवा सी.एच.ए. संघटना नोंदणीकृत न्हावा शेवा सी.एच.ए.आधार सामाजिक संस्था म्हणून कार्यरत आहे, समाजातून सर्व वर्गातून या संघटनेचे कौतुक होत असून या संघटनेच्या आधार चषकाच्या माध्यमातून आधार निधी संकलनासाठी समाजाच्या सर्व स्तरातून सर्वोतोपरी सहकार्य होत आहे या अनुषंगाने आपणही सामाजिक बांधिलकीची जोपासना करावी या उद्देशाने दिनांक ७ जानेवारी २०२४ रोजी श्री दत्त मंदिर पाणदिवे येथे समर्पण ब्लड सेंटर कोप्रोली च्या सहकार्याने रक्तदान शिबिराचे आयोजन केले होते. या शिबिरात २० हुन अधिक महिलांसकट एकूण ११६ रक्तदात्यांनी रक्तदान केले. शिबिराचे उदघाटन भूषण राजू, अमित पाटील,प्रसिद्ध क्रिकेटपट्टू योगेश म्हात्रे कवियत्री हेमाली म्हात्रे आदी मान्यवरांच्या उपस्थितीत पार पडले.

# योग्य स्थळ शोधण्यासाठी परिचय मेळावे गरजेचे

## आ. किशोर जोरगेवार : तेली युवक मंडळाच्या वतीने उपवर - उपवधू परिचय मेळाव्याचे आयोजन

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** मुला - मुलींचे लग्न जमविणे हे अत्यंत कठीण बाब असल्याची जाणीव वधू - वरांच्या पालकांना येत येत आहेत. मुला - मुलींची लग्नं जमावी याकरिता अनेक पालक मंडळी अथवा त्यांच्या नातेवाईकांची धावपड सुरु असते. यावर तोडगा म्हणून आता उपवर उपवधू परिचय मेळाव्यांकडे पाहिल्या जात आहे. त्यामुळे धापडीच्या जिवणात समाजातीलच योग्य स्थळ शोधण्यासाठी अशा मेळाव्यांचे आयोजन गरजेचे असल्याचे प्रतिपादन आमदार किशोर जोरगेवार यांनी केले.

मातोश्री सभागृह येथे विदर्भ तेली समाज महासंघ, तेली युवक मंडळच्या वतीने भव्य उपवर - उपवधू परिचय मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या प्रसंगी ते बोलत होते. या कार्यक्रमाला विदर्भ तेली समाजाचे केंद्रीय अध्यक्ष रघूनाथ शेंडे, माजी आमदार देवराव भांडेकर, प्रा. सुर्यकांत खनके, शहर अभियंता अनिल घुमडे, विदर्भ तेली समाजाचे उपाध्यक्ष धनराम मुंगले, तेली समाज चंद्रपूर जिल्हा महिला अध्यक्ष मिनाश्री गुजरकर, प्रा. गंगाधर कुनघाडकर, जितेंद्र ईटनकर, गोविल मेहकुले, गोपाल ईटनकर, चंदा वैरागडे, सतीश बावणे, नरेंद्र इटनकर, राजेंद्र सावरकर, डॉ. भगवनीका गायकवाड, यांच्यासह ईतर मान्यवरांची मंचावर उपस्थिती होती.

यावेळी पुढे बोलताना आ. जोरगेवार म्हणाले कि, तेली हा सेवेकरी समाज आहे. अनेक सामाजिक आणि धार्मीक कार्यक्रमात हा समाज सक्रियरित्या सहभाग नोंदवितो. आपण चंद्रपूरात आयोजित केलेल्या श्री माता महाकाली महोत्सवातही या समाजाने सेवा दिली. मात्र आता सेवेकरी समाज मागे पडत आहे. त्यामुळे समाजाला एकत्रीत आनण्या-या अशा आयोजनातून याबाबत चिंता आणि चिंतन झाले पाहिजे. आपल्या समाजातील युवकांमध्ये प्रतिभा आहे. समाजातील पूढा-यांनी आता पूढाकार घेत आपल्या युवकांना योग्य मार्गदर्शन करावे. असे ते यावेळी म्हणाले.




लोकप्रतिनीधी म्हणुन मी सदैव तेली समाजा सोबत राहिलो आहे. या समाजाचे अनेक प्रश्न आहेत. याचीही मला जान आहे. ते सोडविण्याच्या दिशेने आपले प्रयत्य सुरु आहे. संताजी शिक्षण प्रसारक मंडळाला समाज भवन उभारण्यासाठी आपण ३० लक्ष रुपयांचा निधी दिला आहे. तर बाबूपेठ येथेही तेली समाज भवणासाठी २० लक्ष रुपयाचा निधी मला देता आला याचा आनंद आहे. समाजाने आवश्यक त्या मागण्या कराव्यात त्या पुर्ण करण्याचा आमचा प्रयत्न राहिल असे ते यावेळी म्हणाले. तेली युवक मंडळच्या वतीने दरवर्षी हे आयोजन केल्या जात आहे. समाजाच्या वतीनेही मोठे सहकार्य याला लाभत आहे. हेच या समाजाचे वैशिष्ट आहे. आजच्या या मेळाव्यात अनेक ऋणानुबंध जुळतील असा विश्वास यावेळी बोलताना आमदार किशोर जोरगेवार यांनी व्यक्त केला. या कार्यक्रमाला समाज बांधवांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# दीप मोरे यांना पुण्याच्या ग्लोबल स्कॉलर फाउंडेशनकडून राज्यस्तरीय भूषण पुरस्कार

आधुनिक केसरी न्यूज

**सागर झनके**

**जळगाव जा :** जळगाव जामोद पंचायत समिती मध्ये विस्तार अधिकारी पदावर कार्यरत असलेले संदीप मोरे यांच्या कार्य कर्तृत्वाचा गौरव म्हणून पुण्याच्या ग्लोबल स्कॉलर फाउंडेशन कडून त्यांना भूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले असून, पुणे यशदा येथे ७ जानेवारीला पदमश्री पुरकार प्राप्त सन्मानित श्री सुधारक ओळवे यांचे हस्ते यशदा औडेटेरियम पुणे येथे सपत्नीक सन्मान चिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले .

नांदुरा पंचायत समिती व जळगाव जामोद पंचायत समिती मध्ये केलेल्या उल्लेखनीय कामगिरी ची माहिती या फाउंडेशन च्या सर्वेक्षनातून घेण्यात आली होती. शासनाच्या विविध योजना,उपक्रम यशस्वी रित्या राबवणे,सामाजिक कार्य करणे,कोरोना काळात रक्तदान शिबिर घेणे,गर्जूना अन्नधान्य पुरवणे अशी विविध कार्य




व यासोबत अनेक श्री संदीप मोरे यांनी केली आहे,उल्लेखनीय म्हणजे गत वर्षी शासनाचा गुणवन्त अधिकारी पुरस्कार सुद्धा श्री मोरे याना प्राप्त असून राज्यपाल महोदय यांचे हस्ते सन्मानित झाला आहे.

संदीप मोरे यांनी घरकुल साठी जागा उपलब्ध करून देण्यासाठी शासनाचे धोरणानुसार उपविभागीय अधिकारी,तहसीलदार,गटविकास अधिकारी यांचे शक्ती प्रदत्त समितीकडून शासन निर्णय येताच राज्यात सर्व प्रथम जळगाव जामोद मधून प्रस्ताव मंजूर करून घेतले असून आतापर्यंत 1525 लोकांना जागा शासकीय धोरणानुसार उपलब्ध करून देण्याचे कर्तव्यह बजावून हक्काचे घरकुल मिळून दिले आहे, तसेच श्री संदीप मोरे यांनी 6 विद्यार्थी स्पर्धात्मक परीक्षेसाठी दत्तक घेतली असून आज पर्यंत त्याचा नामोल्लेख त्यांनी केला नाही हे विशेष! यासाठी ग्लोबल फाउंडेशन पुणे ही महाराष्ट राज्य,गुजरात,गोवा राजस्थान तामिळनाडू या राज्यातील होतकरूंची निवड करत असते यात श्री संदीप मोरे यांची निवड होऊन दिनांक 7 जानेवारी रोजी राज्यस्तरीय भूषण पुरस्काराणे सपत्नीक सन्मानित करण्यात आले,यावेळी विविध राज्यातील पुरस्कार प्राप्त व्यक्ती उपस्थित होते, विशेष म्हणजे विदर्भातून संदीप मोरे यांची एकमेव निवड झाली आहे, त्यामुळे सर्व स्तरावरून त्यांचे कौतुक होत आहे.

# शेती हा मजबूतीचा व्यवसाय होण्यासाठी मिशन जयकिसान अभियानाचा शुभारंभ

## शेतकऱ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभागी होण्याचे आवाहन

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** या भागातील शेतकरी संपन्न व्हावा, शेतीसह कृषीपूरक उद्योगाला जिल्ह्यात चालना मिळावी आणि जिल्ह्यातील ग्रामीण भागात कृषीवैशिट्य असलेली गावे विकसित व्हावी आणि कृषी क्षेत्रात चंद्रपूर जिल्हा एक मॉडेल बनावा असा संकल्प करुन " मिशन जय किसान" अभियानाचा शुभारंभ चांदा अँग्रो या कृषी प्रदर्शनीपासून आपण केला आहे, या अभियानात शेतकरी बांधवांनी उत्स्फूर्तपणे सहभागी व्हावे, असे आवाहन राज्याचे वने सांस्कृतिक कार्य आणि मत्स्यव्यवसाय मंत्री तसेच जिल्ह्याचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी केले आहे. मुनगंटीवार यांच्या मार्गदर्शनात 3 ते 7 जानेवारी दरम्यान चांदा क्लब ग्राऊंडवर चांदा ॲग्रो 2024 चे भव्य आयोजन करण्यात आले असून त्यांच्या अध्यक्षतेखाली कृषी तंत्रज्ञान व्यवस्थान यंत्रणा (आत्मा), कृषी विभाग व पशुसंवर्धन विभागाच्या संयुक्त विद्यमाने आयोजित जिल्हा कृषी महोत्सवाचे उद्घाटन राज्याचे कृषी मंत्री धनंजय मुंडे यांच्या करण्यात आले. याच महोत्वसात पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या संकल्पनेतून दिशा परिवर्तनाची , कास शेती समृध्दीची या ध्यासाने "मिशन जयकिसान" या अभियानाचा शुभारंभ करण्यात आला. शेतक-याला नेहमीच आसमानी व अन्य समस्यांना तोंड द्यावे लागते. वाढत्या लोकसंख्येबरोबरच कमी होत जाणारी जमिनधारणा, सिंचनाच्या नैसर्गिक मर्यादा, पर्यायाने वाढत्या लोकसंख्येच्या प्रमाणात अन्नधान्याची उपलब्धता या प्रमुख समस्या आहेत. पश्चिम महाराष्ट्रात कमी पाणी व जेमतेम जमीन असूनसुद्धा आधुनिकतेच्या भरवशावर तेथील शेती बारमाही हिरवीगार दिसते, याचा अभ्यास करून योग्य नियोजन करावे. जिल्ह्यातील एखादे गाव वैशिष्ट्यपूर्ण असावे; फुलांचे गाव, एखादे गाव भाजीपाल्याचे, तर एखादे गाव फळबागेचे असावे, या हेतूने पालकमंत्री यांचे मार्गदर्शनाखाली जिल्ह्यातील शेतकऱ्यांसाठी कृषि विषयक समस्यांवर मात करण्यासाठी जिल्ह्यात मिशन जयकिसान या अभियानाचा विशेष लोगो व माहितीपुस्तिकेचे अनावरण करुन प्रारंभ करण्यात आली. पालकमंत्री मुनगंटीवार यांनी शेतकऱ्यांना आवाहन करताना म्हटले आहे कि, हे मिशन पंचसुत्रीवर आधारित असून त्यात पीक घनता वाढविणे, पिक विवीधता वाढवून शेतकऱ्यांचे उत्पादन वाढविणे, उत्पादन खर्च कमी करुन पीकाची दर हेक्टरी उत्पादकता वाढविणे, शेतमालास तसेच शेतमालावर प्रकीया करुन मुल्यवर्धन उत्पादनांना बाजारपेठ उपलब्ध करुन देणे व बाजाराशी समन्वय साधून देणे, कृषि व कृषि सलग्न विभागांच्या समन्वयाने एकात्मिक शेती पध्दतीस चालना देणे याआधारे राबवायचे असून यामध्ये सर्वांचा सहभाग अपेक्षित आहे.

# लोकशाहीत पत्रकारांची भूमिका महत्वाची : डॉ. भारती

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** येथील महालक्ष्मी शिक्षण प्रसारक मंडळ संचलित यशोदीप विद्या मंदिर या शाळेत आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांचा जन्मदिन तसेच मराठी भाषेतील पहिले वृत्तपत्र दर्पण दिनाच्या निमित्ताने दि.6 जानेवारी रोजी पत्रकार दिन साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची सुरवात आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून झाली.याप्रसंगी शहर आणि तालुक्यातील सर्व पत्रकार बांधवाचा प्रशस्तीपत्र आणि गुलाब पुष्प देवून संस्थेच्या अध्यक्षा डॉ. लक्ष्मी भारती यांनी सत्कार केला. यावेळी आपल्या मनोगतामध्ये लोकशाहीमध्ये चौथा आधारस्तंभ म्हणून काम करत असताना पत्रकारांची भूमिका महत्वाची असते असे प्रतिपादन डॉ. लक्ष्मी भारती यांनी केले. सर्व पत्रकार बांधवांच्या वतीने श्रीकांत कुलकर्णी यांनी शाळेने आयोजित केलेल्या या कार्यक्रमाबद्दल शाळेचे कौतुक करून आभार मानले. कार्यक्रमाला सुनिल घोडके, दिनेश सावजी, श्रीकांत कुलकर्णी, जमीर शेख, सुनिल मरकड, किशोर पुसे, हुसेन पटेल, राजेंद्र बढे, धनाजी नागे,राजेश थोरात,इसाक कुरेशी, गौरव जोंधळे, आजिनाथ बारगळ, कलीम शेख, हबीबभाई, अतुल वेताळ, दिलीप मिसाळ,उदय खरोटे,आदी पत्रकारासह शाळेचे मुख्याध्यापक महेश काळे, राजाभाऊ वायाळ, कमलाकर व्यवहारे, सोमसिंग देवरे, पल्लवी जाधव, अर्चना हजारे आदी शिक्षक आणि विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राजाभाऊ वायाळ यांनी करून उपस्थित सर्वांचे आभार मानले.



# नाट्यक्षेत्राचे अर्थकारण वाढविण्यासाठी मोठी उडी घेणे गरजेचे : राज ठाकरे

आधुनिक केसरी न्यूज

**भगवान राऊत**

**पिंपरी/ चिंचवड :** नाट्य क्षेत्र हे आपले बल स्थान आहे त्यामुळे नाटक चित्रपटातून वेगवेगळे विषय हाताळले पाहिजेत. नाट्य क्षेत्राचे अर्थकारण वाढविण्यासाठी मोठी उडी घेणे गरजेचे आहे. असे आवाहन मनसेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी केले. अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेच्या वतीने पिंपरी चिंचवड येथील मोरया गोसावी क्रीडा संकुलातील रंगमंचावर आयोजित १०० व्या अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलनातील प्रकट मुलाखतीत ते बोलत होते. प्रसिद्ध नाट्य कलावंत दिपक करंजीकर यांनी राज ठाकरे यांची मुलाखत



घेतली. यावेळी बोलताना राज ठाकरे म्हणाले, मला नाटक पाहायला आवडते. नाटक न पाहणारा माणूस महाराष्ट्रात शोधून सापडणार नाही. नाटक ही प्रत्यक्ष घडणारी गोष्ट आहे. नाटकामध्ये रिटेक नसतो तसेच आमच्या भाषानामध्येही रिटेक नसतो. फिल्म मेकिंग हे माझ पाहिले प्रेम आहे. म्हणूनच कॉलेजला असताना वॉल्ट डिस्मे मध्ये जाऊन ॲनिमेटर व्हायचं होत.

नाटकांबद्दल मला जास्त कुतूहल आहे. एका चौकोनात सगळा आशय आणि विषय कसा आणला जातो. हे मला कळत नाही. नाट्य क्षेत्र हे अत्यंत कठीण क्षेत्र आहे. असे सांगत मराठी माणूस आपला इतिहास विसरत आहे असे ते म्हणाले. एके काळी संपूर्ण हिंद प्रांताचे आपण राज्यकर्ते होतो. मात्र आता आपण सगळ्या गोष्टी गमावात बसलो. जाती पातीत भांडत बसलो. एके काळी महाराष्ट्रातील समाजकारण, राजकारण, संस्था आणि चळवळी या सगळ्या गोष्टी मध्यमवर्गियांच्या हातात होत्या. महाराष्ट्रातल्या मध्यमवर्गियानी पुन्हा एकदा दमदार पाऊल टाकले पाहिजे. कारण महाराष्ट्र हा संपूर्ण देशाला दिशा देणारे राज्य आहे. फुले, शाहू, आंबेडकर, टिळक इथेच घडले. जाती पातीच्या राजकारणात न पडता आपले अस्तिस्त्व सिद्ध करण्यासाठी सज्ज व्हावे. हा महाराष्ट्र एकसंध राहू नये म्हणून काही राजकीय पक्ष, नेते आणि चॅनल्स काम करत आहेत. महाराष्ट्रातल्या जनतेला याच भान राहिलेलं नाही. आणि महाराष्ट्रातील नेते सत्तेत मशगूल आहेत अशी टीका त्यांनी केली.



# राजूर येथे श्रीराम मंदिर लोकार्पणानिमित्त शोभायात्रा

## कलश पूजन व अक्षदा वाटप कार्यक्रम संपन्न

आधुनिक केसरी न्यूज

**श्रीक्षेत्र राजुर :** 22 जानेवारी 2024 या शुभदिनी अयोध्येत प्रभू  श्रीरामांच्या मंदिराची प्रतिष्ठापना करून भव्य असा लोकार्पण सोहळा होणार आहे. यामध्ये सर्व समाज बांधवांनी सामील व्हावे म्हणून राजूर येथे आज सकल हिंदू समाजाच्या वतीने शोभायात्रा काढून अक्षदा वाटप कार्यक्रमातून श्रीराम मंदिर सोहळ्याचे निमंत्रण देण्यात आले. सर्वप्रथम गावातील हनुमान मंदिरात श्रीराम जयराम जय जय राम या महामंत्राचा जप करण्यात आला.कलश पूजन करून व प्रभू रामचंद्र यांची प्रतिमा रथामध्ये ठेवून गावातून शोभायात्रा काढण्यात आली. वारकऱ्यांनी टाळ मृदंगाच्या गजरात श्रीरामाच्या नावाचा जयघोष केला. ग्रामस्थांना श्रीराम मंदिर लोकार्पण सोहळ्याचे निमंत्रण देऊन अक्षदा वाटप करण्यात आल्या. या शोभायात्रेचे ग्रामस्थांकडून जंगी स्वागत करण्यात आले. घरासमोर रांगोळी काढण्यात आल्या होत्या.महिला डोक्यावर कलस घेऊन शोभायात्रेत सामील झाल्या होत्या. जागोजागी प्रभू रामचंद्राच्या प्रतिमेचे पूजन करून दर्शन घेण्यात आले. हातात भगवे ध्वज घेऊन तरुणांनी जय श्रीराम च्या घोषणा दिल्या. राजुरेश्वराच्या पायथ्याशी या शोभायात्रेचा समारोप झाला. यावेळी मोठ्या संख्येने हिंदू समाज बांधव उपस्थित होते.

# पोलीस प्रशासनाला पडला दर्पण दिनाचा विसर

आधुनिक केसरी न्यूज

**दशरथ आंबेकर**

**किनवट :** दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर यांच्या जयंतीनिमित्त ६ जानेवारी रोजी विविध ठिकाणी तालुक्यातच नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्रभरात पत्रकार दिन साजरा केला जातो. लोकशाहीचा चौथा आधारस्तंभ म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पत्रकारांचा नांदेड जिल्ह्यातील सर्वच पोलीस स्टेशन मधून मानसन्मान देऊन पत्रकार दिन  साजरा केला गेला परंतु किनवट तालुक्यातील इस्लापूर येथील पोलीस स्टेशन अपवाद वगळता इतर पोलीस स्टेशन मधून पत्रकारांचा मानसन्मान करण्यात आला पण येथील पोलीस सहाय्यक निरीक्षक उमेश भोसले यांनी पत्रकार दिनानिमित्त पत्रकारांचा मानसन्मान न केल्याने पत्रकारामधून नाराजी व्यक्त केल्या जात आहे. त्याचबरोबर वनविभाग, कृषी कार्यालयामध्ये प्रशासकीय अधिकाऱ्यांनी सुद्धा दर्पण दिनी पत्रकारांना मानसन्मान देण्याऐवजी रीतसर डावलले प्रत्येक कामाची बातमी ही वर्तमानपत्रातून प्रकाशित व्हावी यासाठी सर्वच राजकीय पक्षाचे पुढारी वर्षभर बातम्या लावण्यासाठी पत्रकाराकडे विनवण्या करतात व प्रसिद्धी मिळवण्यासाठी नाही तो खटाटोप करतात. रात्रंदिवस जनतेच्या व या पुढाऱ्यांच्या सेवेत राहणाऱ्या पत्रकारांना मात्र दर्पण दिनी सुद्धा सन्मान मिळत नाही. ही एक शोकांतिका म्हणावी लागेल. विशेषता पोलीस स्टेशनच्या सहाय्यक पोलीस निरीक्षकांना या बाबीचा विसर पडल्याची खमंग चर्चा इस्लापूर शहरांमध्ये पत्रकार वर्गातून ऐकावयास मिळत आहे.

# नागरिकांनी ग्रामपंचायतीच्या माध्यमातून जागरुकतेने गावाचा विकास करून घ्यावा

## जनतेच्या पैशाचा सदुपयोग करावा : प्रा मदनभाऊ डोखळे

आधुनिक केसरी न्यूज



**छत्रपती संभाजीनगर :** केंद्र सरकार व राज्य सरकार ग्रामीण भागातील नागरिकांचा विकास व्हावा यासाठी ग्रामपंचायतला विशेष अधिकार देऊन ग्रामीण भागातील नागरिकांना ग्रामपंचायतच्या माध्यमातून सर्व सुख सोबी मिळाव्यात, यासाठी सरकार सर्वतोपरी प्रयत्न करत आहे. परंतु ग्रामीण भागातील नागरिक मात्र आपल्या गावचा विकास व्हावा यासाठी जागरूक नसल्यामुळे ग्रामपंचायतच्या माध्यमातून सरपंचाला व ठराविक नेत्यांना हाताशी धरून ग्रामसेवक मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार, निधीचा अपहार, करत आहेत, त्यामुळे कामकाजात पारदर्शकता येत नसून संविधानिक कार्याला मुठमाती दिली जात आहे, ही बाब अत्यंत गंभीर आहे. नागरिकांनाही जागरूक होणे गरजेचे आहे. असे प्रतिपादन प्रा मदन भाऊ डोखळे सामाजिक कार्यकर्ते सोयगाव  यांनी केले आहे. प्रत्येक नागरिक ग्रामसभेचा सदस्य आहे. ग्रामपंचायत कारभाराबाबत काही शंका असल्यास त्या विचाराने वेळ प्रसंगी लेखी स्वरुपात सभेच्या किमान दोन दिवस आधी सरपंच व ग्रामसेवक यांच्याकडे तक्रार करून आपला प्रश्न ग्रामसभेत विचारण्यासाठी अजेंड्यावर आला नाही किंवा आयत्या वेळचा विषयी म्हणून सभेपुढे आला नाही. ग्रामसभेत आपली मते मांडणे. पंचायत संबंधी कोणतीही माहिती लेखी अर्ज करून सरपंचाकडून मिळविणे, सरपंच/उपसरपंच/सभासद नीट काम करत नसेल तर, त्यांच्या विरुद्ध जिल्हा परिषद अध्यक्षाकडे किंवा जिल्हा अधिका-यांकडे लेखी तक्रार करणे ही तक्रार कोणीही करू शकतो. सरपंच उपसरपंच यांनी वर्षातून किमान दोनदा ग्रामसभा बोलावली नाही तर त्याविरुद्ध लेखी तक्रार केल्यास उपरोक्त कारणास्तव जिल्हा परिषद स्थायी समिती त्यांचे पंचायत सदस्यत्व रद्द करू शकते. आपल्या वार्डातल्या लोकांच्या विशेषतः गरिबाच्या/ अपंगाच्या/वृद्धांच्या /अनाथांच्या वैयक्तिक अडचणीबदलही सरपंचाकडे अर्ज करणे. आपण केलेल्या अर्जाची प्रत व माहिती आपल्या पंचायत सदस्याला किंवा इतरही सदस्यांना देणे. आपल्या अर्जाचा पाठपुरवठा करणे. ग्रामसभेची नोटीस सात किंवा चार दिवस आधी व येते की, नाही यावर लक्ष ठेवणे. ग्रामसभेस वेळेवर हजर राहणे आणि मिनिटबुकात तपासणी करून सरपंच उपसरपंच व पंचायत सभासद व ग्रामसेवक हे काम बरोबर करत नसल्यास ती बाब जिल्हा परिषद अध्यक्ष, जिल्हाधिकारी, गट विकास अधिकारी, यांच्याकडे लेखी तक्रार करून आणणे. ग्रामसभेत नियमानुसार पंचायतच्या सर्व सदस्यांना हजर राहणे बंधनकारक आहे काही कारणास्तव रजा हवी असेले तर आधीच अर्ज करून मंजूर करून घेणे अशी रजा एका वेळेस सहा महिन्यापर्यंतची मिळते. अशी रजा मंजूर न करता सहा महिन्यात झालेल्या पंचायतीचा सभांना गैरहजर राहिल्यास सहा महिने संपताच त्यांचे / तिचे सभासदत्व रद्द होते. दोन्ही बाबतीत पद रिकामे झाले की नाही हे ठरविण्याचा अधिकार जिल्हा परिषद अध्यक्षाला आहे. याबाबतीत जिल्हा परिषद अध्यक्षाने दिलेल्या निर्णयावर निकालाच्या तारखेपासून १५ दिवसात राज्य सरकारकडे अपील दाखल करावे लागते. वॉर्डातल्या तक्रारी पंचायत पुढे मांडून त्यांचे निवारण करून घेण्यासाठी पराकाष्ठचे प्रयत्न करणे. पंचायतीने ठराव करून आपल्यावर सोपविलेल्या जबाबदाऱ्या उत्तम प्रकारे पार पाडणे, पदाधिकारी सचिव आपल्या कर्तव्यात कसूर भ्रष्टाचार वगैरे करत नाहीत ना यावर बारीक नजर ठेवणे आणि असे काही लक्षात असल्यास ताबडतोब पंचायतच्या सभेत मांडणे ग्रामपंचायतीच्या मासिक सभेत इतीवृत्त ठेवलेली नोंदवही, ग्रामसभेच्या इतिवृत्ताची नोंदवही ग्रामनिधी, चेकबुक, शिल्लक असलेली रक्कम तपासून घेणे, ग्रामनिधीव्यतीरिक्त अन्य कॅशबुक ठेवले असल्यास त्याची चौकशी करून ते पाहून त्यामध्ये दाखवलेली शिल्लक रक्कम तपासून घेणे.



# व्यावसायिक प्रामाणिकता, नावीन्य जपायला हवे

## डॉ. नितीन करीर यांचे प्रतिपादन

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** प्रत्येकाच्या आयुष्यात अडचणी, संघर्ष असतोच; त्याचे स्वरूप वेगवेगळे असू शकते. या अडचणी, संघर्ष बाजूला ठेवून स्वतःला झोकून देत संवेदनशीलपणे लोकसेवेचे काम करत राहायला हवे. मूल्यांशी तडजोड न करता तत्वनिष्ठ भावनेने समाजहिताचे काम करताना व्यावसायिक प्रामाणिकता, नावीन्य जपायला हवे," असे प्रतिपादन राज्याचे मुख्य सचिव डॉ. नितीन करीर यांनी केले. श्रीकांत साबळे लिखित, इग्नाइट पब्लिकेशन प्रकाशित 'संघर्षयात्री' पुस्तकाचे प्रकाशन डॉ. करीर यांच्या हस्ते झाले. बालगंधर्व रंगमंदिरात आयोजित कार्यक्रमात विभागीय आयुक्त सौरभ राव, पोलीस आयुक्त रितेश कुमार, महानगर पालिका आयुक्त विक्रम कुमार, अतिरिक्त पोलीस महासंचालक अमिताभ गुप्ता, पुण्यनगरीचे संचालक भावेश शिंगोटे, लेखक श्रीकांत साबळे, इग्नाइट पब्लिकेशनचे योगेश माने आदी उपस्थित होते. प्रसंगी प्रशासकीय अधिकारी श्रावण हर्डीकर, रमेश घोलप, सागर डोईफोडे, प्रवीण गेडाम, राजेश पाटील, डॉ. अविनाश ढाकणे, कुणाल खेमनार, विशाल सोळंकी, पोलीस अधिकारी निखिल पिंगळे, वैभव निंबाळकर यांचा विशेष सन्मान, तसेच मांडणी व सजावट करणाऱ्या प्रभाकर भोसले यांचा गौरव करण्यात आला.

डॉ. नितीन करीर म्हणाले, "श्रीकांत साबळे यांनी चिकाटीने या पुस्तकाची निर्मिती करत अनेकांच्या प्रेरक कहाण्या वाचकांपर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न केला आहे. प्रत्येकाने संघर्षाला सामोरे जात नवीन काहीतरी कसे निर्माण केले, याचा प्रवास पुस्तकात आहे. पुस्तक, शाळा, मित्रमंडळी, सिनेमा, नाटक, लोकांकडून आपण सतत शिकत राहतो. आपापल्या व्यवसायात चांगले कसे करता येईल, याचा मार्ग दाखवणारे हे पुस्तक आहे."

प्रशासकीय सेवेत कार्यरत व्यक्तीनी समाजहिताची भूमिका कठीण परिस्थितीतून न्याय्य भावनेने मार्ग काढायला हवा. आपल्या समाधानात समाजाचे हित असते. ज्ञान, तत्वे व उद्दिष्ट्ये या तीन गोष्टी कायम जपाव्यात. जिद्दीने, क्षमतेने स्वतःचे विश्व निर्माण करताण समाजसेवेचा दृष्टीकोन सोडता कामा नये. सागर डोईफोडे म्हणाले, "देशाच्या विविध भागातील अधिकाऱ्यांचा प्रवास या पुस्तकातून मांडला आहे. एकप्रकारे हा अधिकाऱ्यांच्या कारकिर्दीचा दस्तावेज आहे. अनेकांसाठी तो प्रेरक ठरेल. समाजासाठी काम करण्याची आस, यश मिळवण्याची जिद्द आणि त्यासाठी केलेले परिश्रम याची जाणीव ठेवून काम करावे.

रमेश घोलप म्हणाले, "आयुष्यात संघर्ष करून परिस्थितीवर मात करत यश मिळवता येते. कठोर परिश्रम, प्रामाणिकपणा तुम्हाला यशाकडे घेऊन जातो. अपयश आले तरच; आपण पेटून उठतो आणि यश मिळवतो. संघर्षातून संवेदनशीलता विकसित होते. परिस्थिती हीच प्रेरणा मानून सकारात्मक काम करत रहावे. स्वागत-प्रास्ताविकात श्रीकांत साबळे यांनी पुस्तक निर्मितीचा प्रवास उलगडला. प्रशासकीय सेवेत यश मिळवताना आलेल्या अडचणी, त्यावर केलेली मात, अधिकारी झाल्यावर आपल्या कामातून उमटवलेला ठसा, स्वतःची बनवलेली विशेष ओळख आणि त्यातून नव्या पिढीला मार्गदर्शक ठरेल, अशी कारकीर्द असलेल्या अधिकाऱ्यांच्या संघर्षाची कहाणी यात आहे. डॉ. अमिताभ गुप्ता, भावेश शिंगोटे यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. अक्षय घोळवे यांनी सूत्रसंचालन केले. योगेश माने यांनी आभार मानले.

# वर्धा–यवतमाळ–नांदेड रेल्वे मार्गाचे  लोकार्पण?

आधुनिक केसरी न्यूज

वर्धा : बहुप्रतिक्षित, बहुचर्चित वर्धा – यवतमाळ – नांदेड रेल्वे मार्गाचे लोकार्पण युवा दिनी म्हणजे १२ जानेवारीला करण्याच्या हालचाली सुरू झाल्या आहेत. या दिवशी पंतप्रधान नरेंद्र मोदी हे व्ही.सी. द्वारे मार्ग खुला झाल्याचे जाहीर करणार आहे. थेट पंतप्रधान कार्यालयातून याबाबत मध्य रेल्वे प्रशासनाला याविषयी विचारणा झाली आहे. खासदार रामदास तडस यांच्या कार्यालयाने यास दुजोरा दिला आहे.या दिवशी खासदार तसेच वर्धा व देवळी येथील तसेच यवतमाळचे आमदार उपस्थित राहू शकतात का, अशी चौकशी झाली. मात्र रेल्वे प्रशासन या दिवशी औपचारिक कार्यक्रम कळंब रेल्वे स्थानकावर तर खासदार वर्धा स्थानकावर कार्यक्रम घेण्याबाबत आग्रही आहे. हा वादाचा मुद्दा आहे. या मार्गाबाबत तडस यांनी सतत पाठपुरावा केला.




# ज्योतीनगरात चंद्रकांत खैरे यांचा वाढदिवस साजरा

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** माजी खासदार तथा शिवसेना नेते चंद्रकांत खैरे यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने "हसू आणि आसू " या काव्य मैफिलीचे व स्नेहभोजनाचे आयोजन करण्यात आले होते. काव्य मैफिलीत प्रा.कवी विजय पोहनेरकर यांनी एकाहून एक सुरेल अशा कविता सादर केल्या त्यांना निवेदक प्रा.रवींद्र मगर यांची सुरेल साथ लाभली,उपस्थिती महिला वर्गांनी या काव्य मैफिलीला उत्तम दाद दिली खैरे यांच्या हस्ते पोहनेरकर, मगर यांना सन्मानचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी सौं.मनीषा प्रदीप ठाकरे यांना ज्योतीनगर शिवसेना महिला आघाडीच्या उपविभाग संघटक पदी निवडीचे नियुक्तीपत्र साहेबांच्या हस्ते देण्यात आले, अभिष्टचिंतन सोहळा समितीतर्फे चंद्रकांत खैरे यांना शॉल, पुष्पहार देऊन शुभेच्छा देण्यात आल्या व स्नेह भोजनाने कार्यक्रमाची सांगता झाली.

या सोहळ्याचे आयोजन अमोल निकाळजे, देविदास रत्नपारखी ,दिनेश तिवारी गिरीश चपळगावकर यांनी केले होते यावेळी महिला आघाडीच्या सुनिता आऊलवार,अरुणा भाटी, छाया अशर हेमा बाबरेकर, माया लोद,ज्योती भारती अश्विनी जागीरदार शुभांगी जागीरदार शुभांगी गव्हाणे, संजय गव्हाणे, राजहंस साहेब,संजय गुजराती,अरुण सोंदे,दिलीप काळे व परिसरातील नागरिकांची उपस्थिती होती, कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अशोक चिमखडे,मनोज खोचे ,सतीश लोया पंकज शर्मा, अमोल यादव,अमोल साखरे ,प्रदीप ठाकरे यांनी परिश्रम घेतले.

# भारत स्वाभिमान वर्धापन दिनानिमित्त वंचितांना गरम चादरींचे वाटप

आधुनिक केसरी न्यूज

**नांदेड :** 5 जानेवारी भारत स्वाभिमान वर्धापन दिनानिमित्त नांदेड शहरातील वंचितांना गरम चादरीचे वाटप करण्यात आले. दत्तात्रय काळे, अनिल अमृतवार, शिवाजीराव शिंदे हळदेकर, प्रदीप तेललवार, राजू सातोनकर आदींनी पाच तारखेला सकाळी चार वाजता फिरून झोपल्या ठिकाणी जे रस्त्यावर उदरनिर्वाह करतात अशांना चादरीचे वाटप केले तसेच कचरा गोळा करणाऱ्यांना चादर वाटप करण्यात आले. समाजला आपलं देणं लागतं आणि कोणत्या ना कोणत्या स्वरूपात आपण ते दिले पाहिजे. दानाने धनाची शुद्धी होते. असे विचार अनिल अमृतवार यांनी व्यक्त केले. चादरी साठी आर्थिक मदत पंढरीनाथ कंठेवाड राज्य कार्यकारणी सदस्य महाराष्ट्र पूर्व, शोभा भागिया राज्य प्रभारी पतंजली महिला योग समिती महाराष्ट्र पूर्व, दत्तात्रय काळे राज्य प्रभारी पतंजली किसान सेवा समिती महाराष्ट्र पूर्व, वसंतराव कल्याणकर, प्रदीप तेललवार, अशोक कुरडे, सुरेखाताई घोगरे, अनिल कामिनवार, व्यंकटेश कवटेकर, भक्ती लॉन चे साधक, पंचाभाई पतंजली प्रभारी नागपूर, उमेश सातोणकर, राजेंद्र शंकरपुरे, जयचंद तत्तापुरे, श्रीकांत अकोलकर आदिनी मदत केली.





# लोह्यात विविध ठिकाणी पत्रकार दिन साजरा

आधुनिक केसरी न्यूज

**लोहा :** शहरातील विविध संस्था, संघटना व कार्यालयाकडून पत्रकार दिन साजरा करण्यात आला. छत्रपती शिवाजी महाराज चौकातील सामाजिक कार्यकर्ते मारोती जंगले यांच्या वतीने आयोजित कार्यक्रमात पत्रकारांना पेन देवून पत्रकारांचा सन्मान करण्यात आला. तसेच लोहा पोलिस ठाण्यात आयोजित कार्यक्रमात प्रारंभी पो. नि. ओमकांत चिंचोलकर यांच्या हस्ते दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमास उपस्थित पत्रकारांना गुलाबपुष्प व लेखणी देवून सन्मानित करण्यात आले. यावेळी पोलिस उपनिरीक्षक मारोती सोनकांबळे, पोउपनि मंगेश नाईक, पोउपनि प्रवीण हलसे तसेच विविध पत्रकार संघाचे अध्यक्ष व पत्रकार आणि पोलिस कर्मचाऱ्यांची बहुसंख्येने उपस्थिती होती. महाराष्ट्र राज्य जुनी पेन्शन हक्क संघटनेच्या वतीने लोह्यातील पत्रकार बांधवांचा सत्कार करण्यात आला. यावेळी संघटनेचे राज्य विश्वस्त गोविंद करखेली, जिल्हाध्यक्ष संतोष शिंदे, तालुकाध्यक्ष मंगल सोनकांबळे, संदिप मस्के, पुंडलिक भोसले, देविदास बालाघाटे, संतोष जोशी आदींसह बहुसंख्येने संघटनेचे पदाधिकारी व पत्रकारांची उपस्थिती होती.

महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाच्या वतीने दर्पण दिन साजरा दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर यांच्या जयंती निमित्त ६ जानेवारी रोजी महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाच्या वतीने पत्रकार दिन साजरा करण्यात आला.

शहरातील शासकीय विश्रामगृहात आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात प्रारंभी महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाच्या वतीने दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. यावेळी महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे जिल्हा निवड समिती अध्यक्ष मोहन पाटील पवार, जिल्हा उपाध्यक्ष सुनील पाटील चव्हाण, प्रदीप कांबळे, तालुका निवड समिती अध्यक्ष गजानन दांगटे, व्यंकटेश वाघमारे, विशाल घंटे, सुनील पाटील पवार, संग्राम पाटील चव्हाण, गणपत पाटील जामगे, संतोष तोंडारे, विलास सावळे, अंबादास पवार आदींची उपस्थिती होती. संघर्ष वाहन चालक मालक संघटनेच्या वतीने पत्रकार दिन निमित्त पत्रकारांचा सन्मान करण्यात आला. यावेळी संघटनेचे चालक चंद्रकांत सोनवळे, प्रल्हाद पाटील पवार, संजय गाडेकर, रज्जाक शेख, अशोक चव्हाण, रफीक कुरेशी आदींसह वाहन चालकांची उपस्थिती होती.

# जीआय सिम्पोझियम परिषद उत्साहात

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** अन्ननलिकेच्या आजाराबाबत समाजात जनजागृती गरजेची आहे. बदलत्या जीवनशैलीमुळे अनेकांना अन्ननलिकेच्या संदर्भात तक्रारी असतानाही त्याकडे ते दुर्लक्ष करतात. वास्तविक पाहता अन्ननलिकेच्या आजाराच्या बाबतीत योग्य निदान व त्यावर वेळीच उपचार मिळाल्यास रुग्णाला मोठा दिलासा मिळू शकतो, असे प्रतिपादन वर्ल्ड इंडोस्कोपी ऑर्गनायझेशनचे (डब्ल्यूईओ) अध्यक्ष व अमेरिकेतील मिलवॉकी येथून आलेल्या डॉ. कुलविंदर दुआ यांनी केले. शहरातील हॉटेल अँबेसेडर येथे दुसऱ्या जीआय सिम्पोसीझम २०२४ या परिषदेवेळी त्यांनी उपस्थितांशी संवाद साधला. अन्ननलिकेसंबंधी आजारांवर मार्गदर्शन करताना ते म्हणाले, अन्ननलिकेच्या कोणत्याही आजाराने ब्लॉक ( इसोफेजिअल स्ट्रिक्चर) होत असल्यास अशा आजारांमध्ये दुर्बिणीद्वारे नवनवीन उपचार पद्धतीच्या मदतीने रुग्णाला अचूक उपचार देता येऊ शकतो. अन्ननलिकेच्या आजारात निदान अत्यंत महत्त्वाचा टप्पा होय, असेही डॉ. कुलविंदर दुआ यांनी नमूद केले. आतड्यांच्या आणि अन्ननलिकेच्या आजाराच्या बाबतीत सखोल मार्गदर्शन करताना डॉ. कुलविंदर दुआ यांनी सर्वसामान्य रुग्णांना देखील लाखमोलाचा सल्ला दिला. उपचार सुरू असताना रुग्णांला डॉक्टरांनी खानपानाच्या बाबतीत दिलेली पथ्ये पाळणे अत्यंत गरजेचे असते. पथ्ये न पाळल्याने रुग्ण औषधींचा अतिवापर केल्याचे बऱ्याचदा पाहतो. त्या अति औषधींचा त्यावर दुष्परिणाम देखील होतो. वास्तविक पथ्ये पाळली तर कमी औषधीत आणि कमी कालावधीत रुग्ण बरा होऊ शकतो, असेही डॉ. दुआ यांनी आवर्जून सांगितले.
तीन दिवसीय परिषदेस देशभरातील साडेपाचशेपेक्षा जास्त पोटविकार तज्ञ मंडळी परिषदेसाठी शहरात आले होते. जीआय वन हॉस्पिटल, फिजिशियन असोसिएशन औरंगाबाद व सर्जिकल सोसायटी ऑफ औरंगाबाद यांच्या संयुक्त विद्यमाने दुसऱ्या जीआय सिम्पोसीझम २०२४ या परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील तज्ञ डॉक्टर सहभागी होऊन पोटविकार, लिव्हरच्या विविध आजार, निदान व अत्याधुनिक उपचार पद्धतीने रुग्णांना कशाप्रकारे दिलासा देता येईल यावर मंथन केले.
इंडियन इन्स्टिटयूट ऑफ गॅस्ट्रोइन्टेरोलॉजीच्या माजी अध्यक्षा डॉ. शोभना भाटिया यांनी अन्ननलिकेच्या आजारांमध्ये मॅनोमेट्रीचे अत्याधुनिक तंत्रज्ञान वापरून अचूक रोग निदान कसे केले जाऊ शकते यावर प्रकाश टाकला.
आतडीमधून नकळतपणे होणारा रक्तस्राव कसा तपासला जावा याविषयी एशियन इन्स्टिटयूट ऑफ गॅस्ट्रोइन्टेरोलॉजीचे पोटविकार तज्ञ डॉ. मोहन रामचंदानी यांनी मार्गदर्शन केले.
अत्याधुनिक दुर्बिणीच्या माध्यमातून गुदद्वाराच्या वरील भागातील गाठी काढण्यासाठी ट्रान्सएॅनल इंडोस्कोपीक मायक्रो सर्जरी यावर हैदराबाद येथील डॉ. संजीव पाटील यांनी मार्गदर्शन केले.
मुंबई येथील डॉ. रवी मोहंका यांनी लिव्हर प्रत्यारोपणाविषयी भारतातील सध्याच्या परिस्थितीवर प्रकाश टाकला. लिव्हर प्रत्यारोपण याविषयी लोकांमध्ये जनजागृती होणे तितकेच गरजेचे असल्याचे त्यांनी नमूद केले. आतडीचा दाह जसे अल्सरेटिव्ह कोलायटीस आणि क्रॉन्झ डिसीज यावर हैदराबाद येथील डॉ. रूपा बॅनर्जी यांनी तर नायर हॉस्पिटलचे डॉ. प्रवीण राठी यांनी आतडीत होणाऱ्या क्षयरोगावर सखोल मार्गदर्शन केले. यावेळी बंगळुरू येथील डॉ. नरेश भट, डॉ. विनय भट, डॉ. सतीश पाटणशेट्टी, डॉ. केदार पाटील, कानपूरच्या बाल पोटविकार तज्ञ डॉ. जया अग्रवाल यांची प्रामुख्याने उपस्थिती होती. तीन दिवसीय परिषदेसाठी आलेल्या पाहुण्यांचे आभार डॉ. अशोक मोहिते यांनी मानले. या परिषदेच्या यशस्वीसाठी फिजिशियन असोसिएशनचे डॉ. संजय पाटणे, डॉ. अनंत कुलकर्णी, सर्जिकल सोसायटी ऑफ औरंगाबादचे अध्यक्ष डॉ. नारायण सानप, सचिव डॉ. सत्यजित पाथ्रीकर, जीआय वन हॉस्पिटलचे डॉ. संदीप भालसिंग, डॉ. मुकेश राठोड, डॉ. विनय झंवर, डॉ. वैभव गंजेवार, डॉ. अशोक मोहिते यांच्या टीमने प्रयत्न केले.



# राजे शहाजी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांची हम्पी पर्यटनस्थळास भेट

आधुनिक केसरी न्यूज

**अंबेलोहळ :** राजे शहाजी महाविद्यालय अंबेलोहळची शैक्षणिक सहल कर्नाटक राज्यातील हम्पी बदामी विजापूर या जागतिक वारसा लाभलेल्या स्थळांना ४ जानेवारी ते ६ जानेवारी दरम्यान संपन्न झाली. दि,४ जानेवारी रोजी चालुक्य राजांची राजधानी असलेल्या बागलकोट जिल्ह्यातील बदामी पर्यटन स्थळाला भेट दिली या ठिकाणी रॉक कट स्ट्रक्चरल मंदिरे प्रसिद्ध आहेत तसेच बदामी किल्ला अगस्त तलावाच्या शेजारी वालुकामय भूतनाथ मंदिर नटराजाची मूर्ती व चार गुहा बदामीचे विशेष आकर्षण आहेत. ऐहोळे येथील दुर्गा व बनशंकरी देवीचे दर्शन घेतले.
दि,५ जानेवारी रोजी विजयनगरचा राजा कृष्णदेवराय व हरिहर बुक्क यांच्या साम्राज्याची राजधानी असलेल्या हम्पी पर्यटन स्थळास भेट दिली हम्पीचा उल्लेख पुराणामध्ये किस्किंदानगरी म्हणूनही आढळतो हम्पी हे जागतिक वारसा स्थळ म्हणून संयुक्त राष्ट्र संघटनेने घोषित केलेले जगप्रसिद्ध पर्यटन स्थळ येथे वीरपाक्ष मंदिर लोटस टेम्पल हत्ती तबेला कृष्ण मंदिर राजवाडा व विविध पर्यटन स्थळांना भेटी दिल्या तसेच अंजनी पर्वतातील बजरंग बली हनुमान यांच्या जन्मस्थानस भेट दिली सहा जानेवारी रोजी विजापूरचा गोल घुमट व पंढरपूर तीर्थक्षेत्र भेट दिली शैक्षणिक सहलीस कार्यकारी संचालक श्री गणेश बनकर पाटील प्राचार्य डॉ.शिवाजी केसकर सहल विभाग प्रमुख निकिता जाधव प्रा राजू धनवान प्रा अनिल चव्हाण प्रा दीपा पटेलश्री शेकनाथ चव्हाण श्री जयंत अंभोरे यांची उपस्थिती होती.



# शिक्षक भरती प्रक्रियेला वेग

## रिक्तपदांची माहिती पवित्र प्रणालीवर दाखल


आधुनिक केसरी न्यूज

**वसंत पाटील**


**वाशिम :** राज्यात शिक्षक भरतीसाठी सर्वच व्यवस्थापनांना जाहिरात देण्याची सुविधा पवित्र प्रणालीवर उपलब्ध करुन देण्यात आली आहे. अशी माहिती शिक्षण विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दिल्यामुळे शिक्षक भरतीच्या प्रक्रियेला वेग आला आहे. त्याअनुषंगाने वाशिम जिल्ह्यातील रिक्त पदांची माहिती पवित्र प्रणालीवर भरली असून मान्यता मिळाली की, लवकरच पुढील प्रक्रियेला सुरवात होईल अशी माहिती शिक्षण विभागातील विश्वसनीय सूत्रांनी दिली आहे. परिणामी जिल्ह्यातील बहुप्रतीक्षेत असलेल्या भावी शिक्षकांना दिलासा मिळाला आहे.

राज्यात पवित्र प्रणालीद्वारे सुरू करण्यात आलेल्या शिक्षक भरती प्रक्रियेमुळे बहुप्रतिक्षेत असलेल्या उमेदवारांना खुप मोठा दिलासा मिळाला आहे. तद्वतच काही जिल्हापरिषदेच्या शिक्षक भरतीसाठीच्या जाहिराती प्रसिद्ध झाल्यामुळे इच्छुकांच्या आशा आणखीनच पल्लवीत झाल्या आहेत. राज्यातील इतर काही जिल्ह्याप्रमाणेच वाशिम जिल्ह्यात सुद्धा प्राथमिक व माध्यमिक शिक्षकांची अनेक पदे रिक्त असून त्यासाठी पात्र असलेल्या उमेदवारांची संख्या सुद्धा बरीच आहे. त्यामुळे जिल्ह्यासह रिसोड तालुक्यातील शेकडो इच्छुक उमेदवारांचे सुद्धा शिक्षक भरतीकडे डोळे लागून होते.मात्र उपरोक्त शिक्षक भरतीसंबंधी माहिती मिळताच त्यांच्या आशेचा किरण फुलला असून वाशिम जिल्ह्यातील शिक्षक भरतीच्या जाहिराती प्रसिद्ध होण्याकडे आता सर्वांचेच लक्ष लागले आहे. राज्यातील सर्व स्थानिक स्वराज्य संस्था, खाजगी व्यवस्थापनांच्या शाळांमध्ये पवित्र प्रणालीद्वारे शिक्षक पदभरतीसाठी शासनाने शिक्षक अभियोग्यता व बुद्धिमत्ता चाचणी २०२२ मधे घेतली होती. सदर चाचणीसाठी नोंदणी केलेल्या दोन लाख ३९ हजार ७३० उमेदवारांपैकी तब्बल दोन लाख १६ हजार ४४३ उमेदवारांनी प्रत्यक्ष चाचणी दिली आहे. तर आतापर्यंत एक लाख ६२ हजार ६८२ उमेदवारांनी शिक्षक भरतीसाठीची स्वप्रमाणपत्र प्रक्रिया पुर्ण केली असल्याची माहिती रिसोड तालुक्यातील एका शिक्षक भरतीच्या प्रतिक्षेत असलेल्या उमेदवाराने दिली आहे. आणि जिल्ह्यातील रिसोडसह, इतर सर्वच तालुक्यात शिक्षक भरतीसाठी पात्र असलेल्या भावी शिक्षकांची संख्या मोठ्या प्रमाणात असल्याचे सुद्धा सांगितले आहे.

**रोष्टर प्रक्रिया सुरु आहे :** राज्यातील जिल्हा परिषद, नगर परिषद आणि छोट्या स्थानिक संस्थांच्या रोष्टरची प्रक्रिया पुर्ण झाली असल्याची खात्रीशीर माहिती उपलब्ध झाली आहे. तर काही मोठ्या खाजगी संस्थांची रोष्टरची प्रक्रिया सुरु आहे. परिणामी येत्या दहा, पंधरा दिवसात ही प्रक्रिया पुर्ण होऊन लवकरच खाजगी संस्थांच्या पद भरतीच्या जाहिराती सुरु होतील असे स्पष्ट संकेत आहेत.



शिक्षक भरतीची प्रक्रिया बऱ्याच दिवसापासून प्रलंबित होती. ती प्रशासनाने आता सुरु केली यात समाधान आहे. कारण प्रतीक्षेत असलेल्या अनेक पात्र उमेदवारांना न्याय मिळणार आहे. शैक्षणिक विकासात शिक्षकांचे खुप मोठे योगदान असते त्यादृष्टीने ही आनंदाची बाब आहे. शिवाय रोष्टर प्रणाली पुर्ण होणार असल्यामुळे खाजगी संस्थांमधील पद भरतीचा मार्ग मोकळा होणार आहे..! **बाबाराव पाटील खडसे,** ( जिल्हाध्यक्ष राष्ट्रवादी कॉंग्रेस वाशिम तथा संस्थापक जीवन विकास संस्था रिसोड )



वाशिम जिल्ह्यातील सर्व रिक्त पदांची माहिती पोर्टलवर भरलेली आहे. त्याअनुषंगाने शिक्षण आयुक्त आज ३ वाजता आढावा बैठक घेणार आहेत. तद्वतच पोर्टलवर भरलेल्या माहितीला प्रशासकिय मान्यता मिळाली की पुढील प्रक्रियेला सुरवात होणार आहे..! **राजेंद्र शिंदे,** ( शिक्षणाधिकारी वाशिम )



# भाजप कार्यकर्त्यांचा आ. विजय भांबळे यांच्या उपस्थितीत राष्ट्रवादीत जाहीर प्रवेश

आधुनिक केसरी न्यूज

**जिंतूर :** सेलू तालुक्यातील भाजपच्या कार्यकर्त्यांचा राजाभाऊ भाऊसाहेब कदम (चेअरमन) यांच्या मार्गदर्शनाखाली मा.आ.विजय भांबळे यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून जनसंपर्क कार्यालय, येलदरी रोड जिंतूर येथे राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षात जाहीर प्रवेश करण्यात आला. त्यात मौजे देऊळगाव गात येथील सोसायटी सदस्य कोंडीबा विठ्ठल हनवते, रामेश्वर कोंडीबा हनवते, अनिल पाचलेगावकर, दत्ता डूरे, गजानन हातकडके, विष्णू काळे, सुरेश तायडे, गोविंद हातकडके, नवनाथ हातकडके, रोहिदास गायकवाड, अंगद साखरे, गोरख पारवे, सुरज पारवे, अशोक भाग्यवंत, ओम पाचलेगावकर, राम कदम, पवन वाव्हरे, गोपाळ वाव्हरे, सिद्धेश्वर कदम, शुभम साखरे, तुकाराम कदम, समर्थ कणसे, प्रल्हाद वाघमारे, दिनेश वाघमारे,दीपक शिंदे, संभाजी कदम, बाळासाहेब साखरे ई. नी भाजपची ध्येय धोरणे व सेलू येथील अकार्यक्षम नेतृत्व यांना कंटाळून मा.आ.विजयराव भांबळे यांच्यावर विश्वास ठेवत राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षात जाहीर प्रवेश केला यावेळी मा.आ.विजयराव भाबळे यांनी सर्वांचे हार व पक्षाचा रुमाल घालून पक्षात स्वागत केले व पुढील निवडणुकीसाठी सर्व ताकतीने कामास लागून मा.ना. शरदचंद्रजी पवार साहेब यांचे विचार व विकास तळागळापर्यंत पोहचवण्याचा सल्ला दिला. यावेळी मनोज थिटे, प्रवीण चव्हाण, गंगाधरआप्पा तरटे, धीरज राजेभाऊ कदम, धनंजय राजेभाऊ कदम, वैभव विजय कदम व तसेच राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचे अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.

# औद्योगिक वसाहतीत विभागीय प्रशासकीय इमारत कामाचा शुभारंभ

आधुनिक केसरी न्यूज




**धुळे :** महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या वतीने धुळे औद्योगिक वसाहतीत प्रशासनाचे काम सुलभ व्हावे म्हणून आ.फारुख शाह यांच्या प्रयत्नाने प्रशासकीय इमारत बांधणे या कामासाठी दहा कोटी बारा लाख रुपये निधी मंजूर करण्यात आला आहे.या कामाचा शुभारंभ आज आ.फारुख शाह यांच्या शुभहस्ते करण्यात आला. धुळे औद्योगिक वसाहतीत मोठ्या प्रमाणात विकसित होत असून तसेच नरडाणा औद्योगिक वसाहत सुद्धा चांगल्या प्रकारे विकसित होत आहे या औद्योगिक वसाहतीत उद्योजकांच्या वेगवेगळ्या समस्यांसाठी त्यांना नाशिक व जळगाव येथे जावे लागत होते ही समस्या धुळे जिल्ह्यातील उद्योजकांनी आ.फारुख शाह यांच्याकडे मांडली त्यांच्या या निवेदनाचा विचार करता आ.फारुख शाह यांनी उद्योग मंत्री सावंत साहेब यांच्याकडे मागणी केली व याच्यासाठी दोन वर्ष पाठपुरावा केला या मागणीचा विचार करता उद्योग मंत्र्यांनी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या वतीने धुळे औद्योगिक वसाहतीत प्रशासकीय इमारतीसाठी दहा कोटी बारा लक्ष रुपये मंजूर केले. या इमारतीमुळे धुळे जिल्ह्यातील उद्योजकांना मोठ्या प्रमाणे प्रशासकीय कामासाठी सोयीचे होईल तशी प्रशासनातील अधिकाऱ्यांना सुद्धा या मोठ्या इमारतीमुळे प्रश्न प्रशासनाचे काम सुलभ होणार आहे. या भव्य इमारतीत उद्योजकांचे व प्रशासनातील अधिकाऱ्यांचे काम सुलभ होणार असून आता उद्योजकांना जळगाव नाशिक मुंबई येथे न जाता धुळे येथेच आपले काम मांडावे लागतील यामुळे उद्योजकांना होणारा त्रास वाचणार आहे .आज झालेल्या या कार्यक्रमात मोठ्या प्रमाणात उद्योजक व महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या अधिकारी उपस्थित होते यावेळेस उद्योजकांनी आ.फारुख शाह यांचे आभार मानले व अपेक्षा केली की धुळे जिल्ह्यातील उद्योग वाढवण्यासाठी धुळे जिल्ह्यात एक सेमिनार घेण्यात यावा त्यामुळे उद्योजकांना चालना मिळेल व देशभरातील उद्योगपती आपले उद्योग लावण्यासाठी पुढे येतील.यापूर्वी आ.फारुख शाह यांच्या प्रयत्नानेधुळे औद्योगिक वसाहतीसाठी सुसज्ज अग्निशमन केंद्र उभारण्याचे काम प्रगतीपथावर असून औद्योगिक वसाहतीचा पाण्याचा प्रश्न देखील ३७ कोटी रुपयांची हरण्यामाळ पाणीपुरवठा योजना मंजूर करून निकाली काढला आहे. शुभारंभप्रसंगी आ.फारुख शाह यांचे सोबत भिखनहाजी शाह, डॉ. दिप्शी नाईक, निजाम सैय्यद, इकबाल शाह,डॉ. बापुराव पवार,आसिफ शाह,हारुण खाटीक, सउद आलम, सलमान खान, रियाज शाह, समीर शाह, फैसल अन्सारी उपस्थित होते.

# निवडणुकीच्या फेऱ्यात अडकली कापूस खरेदी!

आधुनिक केसरी न्यूज

**अमरावती :** महाराष्ट्र राज्य कापूस पणन महासंघाला कापूस खरेदीची परवानगी मिळाली असली, तरी भारतीय कापूस महामंडळासोबत (सीसीआय) करारनाम्यास होत असलेला विलंब आणि पणन महासंघाच्या निवडणुकीची प्रक्रिया यामुळे पणन महासंघामार्फत कापूस खरेदी सुरू होण्यास अजूनही महिनाभराचा कालावधी लागेल, अशी शक्यता वर्तवली जात आहे.

शेतकऱ्यांच्या कापसाला भाव नसल्यामुळे मोठ्या प्रमाणात कापूस शेतकऱ्यांच्या घरात पडून आहे. राज्य पणन महासंघातर्फे खरेदी केंद्र सुरू होण्याची प्रतीक्षा शेतकरी करीत आहेत. पणन महासंघातर्फे खरेदी केंद्र सुरू करण्यासाठी केंद्र सरकारकडे परवानगी मागण्यात आली होती. गेल्या महिन्याच्या अखेरीस सीसीआयने राज्यात आपले अभिकर्ता म्हणून कापूस उत्पादक पणन महासंघाला कापूस खरेदीची परवानगी दिली आहे. पण, अद्याप सीसीआयसोबत करारनामा झालेला नाही. कापूस पणन महासंघाला कापूस खरेदीसाठी कर्ज घ्यावे लागते, त्यासाठी राज्य सरकारची हमी, खरेदीसाठी लागणारे मनुष्यबळ ही सर्व व्यवस्था अद्याप झालेली नसल्याने पणन महासंघामार्फत खरेदी सुरू होऊ शकली नाही. दुसरीकडे, पणन महासंघाच्या संचालक मंडळाच्या निवडणुकीची प्रक्रिया सध्या सुरू आहे. या निवडणुकीचा निकाल ९ जानेवारी रोजी जाहीर होणार आहे.

# मोखाड्यात सापडले अनोळखी अर्भक, वाहन चालकाने दिले जीवदान

आधुनिक केसरी न्यूज

**अमोल टोपले**

**पालघर :** समाजात एकीकडे जगात आईचे महत्व सांगणारी, आई आपल्या मुला बाळासाठी प्रसंगी जीवही देऊ शकते अन् जीवही घेऊ शकते अशी अनेक उदाहरणे आपण आजवर पाहिलेली आहेत. मात्र,पालघर जिल्ह्यातील मोखाडा तालुक्यात आई नाहीस तू वैरिण असल्याची वेळ आली आहे कारण तालुक्यात पुरुष जातीचे एक जिवंत अर्भक सापडले असल्याने एकच खळबळ उडाली आहे. पोटच्या पोराला बेवारस सोडून टाकणाऱ्या 'त्या' मातेबद्दल प्रचंड संताप व्यक्त होत असून समाजात मुल बाळ व्हावं यासाठी असंख्य उपचार, प्रयत्न करणारी अनेक जोडपी असताना पोटाच्या गोंडस बाळाला मारण्यासाठी बेवारस सोडून देणाऱ्या अशा प्रवृत्तीमुळे खर तर अनेक चर्चांना आता उधाण आले आहे. तालुक्यातील वाशाळा येथे राहणारा पेशाने चालक असलेला आकाश लहामगे व्यवसाय निमित्ताने पोशेरा फाट्यावरून वाखारीचापाडा गावच्या शिवारात नदीच्या पात्राच्या आसपास लाल कपड्यात एक अनोळखी अंदाजे २ दिवसांचे पुरुष जातीचे अर्भक त्याला आढळून आले. अशा वेळी त्याने गाडी थांबवून तो सगळा प्रकार पाहिला. अशावेळी आकाश यांनी आरोग्य सेवकचे काम करीत असलेल्या त्यांच्या नातेवाईकास कळवले. त्यांनी तालुका आरोग्य अधिकारी भाऊसाहेब चत्तर यांना ही माहिती दिल्यानंतर मोखाडा पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. खरं तर संबंधित अर्भक जिवंत असल्यामुळे काही वेळापूर्वीच सोडून गेल्याचा अंदाज आहे. तर अगदी रस्त्याच्या कडेला नदी पात्रापासून लांब सदर अर्भक सोडल्यामुळे खर तर सोडणाऱ्यालाही ते जिवंत राहावं असा अंदाज व्यक्त होत आहे. मात्र, या घटनेमुळे तालुक्यात संताप व्यक्त होत असून सदर अर्भकास पुढील उपचारासाठी जव्हार कुटीर रुग्णालयात पाठविण्यात आले आहे. याचा पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रदीप गीते, पोलीस उप निरीक्षक संजय भुसाळ करीत आहे

हिवराळे क्लिनिक
ॲण्ड हर्बल हेल्थ केअर
9130174444
डॉ. के.बी. हिवराळे
आयुर्वेद जनरल फिजिशियन, ॲक्युपंक्चर तज्ज्ञ
B.A.M.S., N.D.,C.M.S.& Ed(MUMBAI)
R.No.2366/12/2000
एमसीए/2022/10/बी/000839 बॉम्बे नर्सिंग होम परवाना क्र.218, औरंगाबाद

उपलब्ध सुविधा

- जुनाट सांधे दुखी (गुडघे दुखी)
- आम वात उदर रोग
- दमा व अॅलर्जी (जुनाट)
- चिकन गुनिया
- मनोकयीईक आजार
- त्वचा व गुप्त रोग
- स्त्रीयांचे आजार
- स्थूलपणा, मूळव्याध
- वंध्यत्व, संतती प्राप्ती
- कॅन्सर सल्ला, मुतखडा
- वजन वाढविणे
- वजन कमी करणे
- केसांच्या सर्व तक्रारी
- लहान मुलांची
- स्मरणशक्ती वाढविणे

पंचकर्म सुविधा (मुख्यकार्य) 1) वमन, 2) विरेचन, 3) बस्ती, 4) नस्य, 5) रक्तमोक्षन



अजिंठा रोड, सारा कॉलनी, फुलंब्री, ता. फुलंब्री, जि. औरंगाबाद

# प्रेस क्लब संस्कृतीच्या युगात पत्रकार संघ टिकून

## खा. संजय राऊत : पत्रकारदिनी पत्रकार भवनात दर्पणकारांच्या प्रतिमेचे पूजन

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** प्रेस क्लबच्या अत्याधुनिक युगातही मुद्रित माध्यमे व इलेक्ट्रॉनिक माध्यमांद्वारे पत्रकार संघ टिकवून ठेवत त्याचा कारभार उत्तम प्रकारे चालवीत असल्याचे पाहून खूप समाधान व अभिमान वाटत असल्याची भावना शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते तथा दैनिक सामनाचे कार्यकारी संपादक, खासदार संजय राऊत यांनी पत्रकारदिनी धुळ्यात व्यक्त केली. खा. संजय राऊत हे शनिवारी धुळे दौऱ्यावर आले असता त्यांनी पत्रकार दिनाचे औचित्य साधून आपल्या नियोजित कार्यक्रमांमधून वेळ काढत धुळे जिल्हा मराठी पत्रकार संघाच्या पत्रकार भवनास भेट दिली. पत्रकार भवनाचे रुपडे पाहून खा. राऊत चांगलेच भारावले. पत्रकार भवनातील मौल्यवान, दुर्मिळ ग्रंथसंपदा पाहून राऊत यांनी समाधान व्यक्त केले. यातील अनेक पुस्तकांच्या लेखकांशी माझा वेळोवेळी प्रत्यक्ष संबंध आला आहे. त्यातील काही लेखक माझे चांगले मित्र असल्याचे खा. राऊत यांनी नमूद केले. यावेळी मनोगत व्यक्त करताना खा. राऊत म्हणाले की, मी सर्वात अगोदर एक पत्रकार आहे याची रोजच जाणीव ठेवतो. माझ्यासोबत नेहमी कोरे कागद व पेन बाळगतो. दररोज लिखाणाची सवय यातूनच माझी पत्रकारिता मोठी झाली आहे. मी दैनिक सामनाला सर्वात आधी प्राधान्य देतो. पत्रकारितेच्या विश्वात प्रिंट मीडियाचे महत्व कधीच कमी होणार नाही असा ठाम विश्वास खा. संजय राऊत यांनी व्यक्त केला. पत्रकार संघातर्फे खा. संजय राऊत यांचा यथोचित सत्कार करण्यात आला. याप्रसंगी पत्रकार संघाचे माजी अध्यक्ष रवींद्र इंगळे, नुरखान पठाण, विद्यमान अध्यक्ष मनोज गर्दे, उपाध्यक्ष अतुल पाटील, सचिव सचिन बागुल, कोषाध्यक्ष तुषार बाफना, प्रांतिक प्रतिनिधी प्रकाश शिरसाठ, पुरुषोत्तम पाटील, आकाश सोनवणे, दीपक पाटील, पंकज पाटील, अजिंक्य देवरे, पुरुषोत्तम गरुड उपस्थित होते.





# विभागीय क्रीडा संकुलात होणार 'नमो चषक क्रीडा व सांस्कृतिक महोत्सव'

## महोत्सवानिमित्त भरणार मिनी ऑलम्पिकचा मेळा

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** स्वामी विवेकानंद यांची जयंती अर्थात राष्ट्रीय युवा दिनानिमित्त छत्रपती संभाजीनगर क्रीडा मंच व छत्रपती संभाजीनगर ऑलम्पिक असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने विभागीय क्रिडा संकुल येथे 'नमो चषक क्रीडा व सांस्कृतिक महोत्सव' आयोजित करण्यात आला आहे. १२ जानेवारीपासून सुरू होणाऱ्या या क्रीडा महोत्सवात ५१ खेळांचा समावेश करण्यात आल्याची माहिती पत्रकार परिषदेत या नमो चषकाचे मुख्य आयोजक केंद्रीय अर्थ राज्यमंत्री डॉ.भागवत कराड यांनी दिली. यावेळी गृहनिर्माण व बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे, छत्रपती संभाजीनगर क्रीडा मंचाचे डॉ. दत्ताभाऊ पात्रीकर, सचिन मुळे, अजित मुळे, मनीष धूत छत्रपती संभाजीनगर ऑलंम्पिक संघटनेचे अध्यक्ष पंकज भारसाखळे, उपाध्यक्ष डॉ. उदय डोंगरे, सचिव गोविंद शर्मा उपस्थित होते. स्वामी विवेकानंदांची भाषणे, त्यांची शिकवण तरुणांसाठी नेहमीच प्रेरणादायी ठरली आहेत. आपल्या देशाती प्रतिभावान तरुणांना राष्ट्र उभारणीसाठी प्रेरित करण्यासाठी, त्यांच्या कलागुणांना वाव मिळावा, क्रीडा क्षेत्राचा सर्वांगीण विकास व्हावा व देशासाठी नवतरुण युवा उत्कृष्ट खेळाडू तयार व्हावेत या हेतूने देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून या महोत्सवाचे आयोजन देशभर होत आहे. हा केवळ महोत्सव नसून शहरात मिनी ऑलम्पिकचा मेळा असणार आहे. कारण नॅशनल गेम्स नंतर राज्यामध्ये प्रथमच एवढ्या मोठ्या संख्येने एका छताखाली ५१ खेळांच्या स्पर्धा घेण्यात येत आहे. राज्यातील विविध जिल्ह्यात नमो चषक क्रीडा व सांस्कृतिक महोत्सव घेण्यात येत आहे. अन्यत्र १० ते १५ खेळांच्याच स्पर्धा नमो चषक मधे घेण्यात येत आहे. छत्रपती संभाजीनगरात ऑलम्पिक संघटनेने सर्वच खेळांच्या स्पर्धा घेण्यात यावा असा आग्रह नमो चषकचे मुख्य आयोजक केंद्रीय अर्थ राज्यमंत्री डॉ.भागवत कराड यांच्या कडे धरल्याने ऑलम्पिक संघटनेच्या सहकार्याने पहिल्यांदाच या महोत्सवाच्या माध्यमातून ५१ क्रीडा स्पर्धा एकाच वेळी घेण्यात येत आहे. स्विमिंग वगळता सर्व स्पर्धा विभागीय क्रीडा संकुल येथील इनडोअर आणि आऊटडोअर परिसरात १२ ते १७ जानेवारी दरम्यान होणार आहे. तसेच कन्नड, वैजापूर, गंगापुर येथे ही नोमो चषकचे आयोजन करण्यात येत आहे. नमो चषक स्पर्धेमध्ये आयोजित करण्यात येणाऱ्या ५१ खेळांसाठी ऑलम्पिक संघटनेच्या वतीने प्रत्येक खेळासाठी संबंधित खेळाच्या संघटनेकडून १ कॉर्डिनेटरची नेमणूक करण्यात आलेली आहे. नोंदणी, स्पर्धेचे तांत्रिक नियोजन, निकाल तसेच खेळाडूंना इतर माहिती या कॉर्डिनेटरकडून खेळाडूंना मिळेल. तर या सर्व ५१ खेळांमध्ये प्रत्येकी एक राष्ट्रीय किंवा आंतरराष्ट्रीय खेळाडूला आयकॉन खेळाडू म्हणून या स्पर्धेसाठी निवड करण्यात आली आहे. स्पर्धा यशस्वी करण्यासाठी २ हजाराहून अधिक पंच, ५०० स्वयंसेवक, शंभरहून अधिक डॉक्टर्स व विविध स्वयंसेवी संस्थेचे पदाधिकारी काम पाहणार आहेत. मराठवाडयातील खेळाडूंनी राष्ट्रीय-आंतराष्ट्रीय स्तरावर नावलौकिक मिळविलेला आहे. मराठवाडयातच राज्य क्रीडा विद्यापीठावर हक्क असून छत्रपती संभाजीनगरात राज्य क्रीडा विद्यापीठ स्थापन झाले पाहिजे, अशी भूमिका केंद्रीय राज्यमंत्री डॉ.भागवत कराड यांची होती. त्यांच्याच विशेष प्रयत्नानंतर छत्रपती संभाजीनगरात क्रीडा विद्यापीठ स्थापन करण्यात येत आहे. 'साई'मध्ये खेळाडूंना सोयी-सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी वेळोवेळी पाठपुरावा त्यांनी करुन तत्कालीन क्रीडामंत्री किरेन रिजीजू यांच्या माध्यमातून ४९ कोटी साई केंद्रला मिळून दिले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात ११ कोटी ७५ लाख रुपये खर्चुन मराठवाड्यातील पहिले अत्याधुनिक सिंथेटिक ट्रॅक तयार करण्यात येत आहे. १० लेनच्या ४०० मी लांबीच्या सिंथेटिक ट्रॅकची निर्मिती करण्यासाठी केंद्र सरकारच्या 'खेलो इंडिया' उपक्रमांतर्गत सात कोटींचा निधी डॉ.कराड यांच्या सहकार्याने प्राप्त झाला आहे.

**या स्पर्धांचा असणार समावेश :** छत्रपती संभाजीनगर क्रीडा मंच व छत्रपती संभाजीनगर ओलंपिक असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमानाने आयोजित नमो चषक क्रीडा महोत्सव ऑलिंपिक असोसिएशनच्या तांत्रिक सहकार्याने व ५१ विविध खेळांच्या क्रीडा संघटनेच्या मान्यतेने व सहकार्याने पार पडणार आहे. महोत्सवात प्रामुख्याने खो-खो, बॅडमिंटन, ॲथलेटिक्स, बास्केटबॉल, फुटबॉल, सायकलिंग, पॅरा ॲथलेटिक्स, पॅरा स्विमिंग, जिम्नॅस्टिक, तायक्वांदो, टेबल टेनिस, बुद्धिबळ, ज्यूडो, योगासना, बॉडी बिल्डिंग, कराटे, कबड्डी, स्विमिंग, तलवारबाजी, लॉन टेनिस, स्विमिंग, रायफल शूटिंग, बॉक्सिंग, हॉकी, व्हॉलीबॉल, वेटलिफ्टिंग, कुस्ती, स्केटिंग, जम्प रोप, हँडबॉल, गोल्फ, डॉजबॉल, टेनिस बॉल क्रिकेट, किक-बॉक्सिंग, सॉफ्टबॉल, रस्सीखेच, वूशु, ड्रॉप रोल बॉल, तेनिकोईत, ट्रायथलॉन, बेसबॉल, रग्बी, मल्लखांब, रोप मल्लखांब, आर्चरी, कॅरम, शूटिंग वॉलीबॉल, थ्रो बॉल, गदा युद्ध आणि एरोबिक्स जिमनॅस्टिक या स्पर्धा घेण्यात येणार आहे.

**खेळाडूंना करता येणार बक्षिसांची लयलूट :** सहभागी होणाऱ्या खेळाडूंना स्पर्धेमध्ये वैयक्तिक गटात प्रथम, द्वितीय व तृतीय येणाऱ्या खेळाडूंना मेडल, प्रमाणपत्र व आकर्षित बक्षीस देण्यात येणार आहे. तर सांघिक गटामध्ये प्रथम, द्वितीय, तृतीय येणाऱ्या सर्व संघास चषक, मेडल व प्रमाणपत्र तसेच आकर्षक बक्षीस देण्यात येणार आहे. व्यक्तिगत गटामध्ये एकूण २ हजार २३० गोल्ड मेडल, २ हजार २३० सिल्वर मेडल, २ हजार ५९० ब्राँझ मेडल तर सांघिक गटामध्ये प्रथम येणाऱ्यांना १२२ चषक, द्वितीय येणाऱ्यांना १२२ चषक आणि तृतीय स्थान पटकावणाऱ्यांना संघाना १०९ चषक या स्पर्धेमध्ये प्रदान करण्यात येणार आहे. स्पर्धेमध्ये विविध ५१ खेळांचे २५ हजारावरून अधिक खेळाडू जिल्हाभरातून सहभागी होणार आहेत.

# दर्पणदिनानिमित्त पोलिसांकडून सन्मान

आधुनिक केसरी न्यूज

**बाजार सावंगी :** खुलताबाद तालुक्यातील बाजार सावंगी दुरक्षेत्र पोलिस चौकी येथे आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या संस्मरण तथा दर्पण दिनानिमित्त ग्रामीण पत्रकारांचा शॉल पुष्पगुच्छ देऊन सत्कार सन्मानित करण्यात आले. जेष्ठ पत्रकार पाटील सर यांनी पत्रकार संदर्भात कार्य कुशलता मांडली तर पत्रकार यांच्या कार्यातून समस्यांचे उचटन विकासाला हातभार गावाचे नाव यांबाबत उदगार काढले तर दुरक्षेत्र पोलिस चौकीचे मुख्य जमादार विनोद बिघोत, पोलिस भालेराव,पोलिस बनसोड, पोलिस सपकाळ, संतोष पुंड यांनी पत्रकार पाटील सर,चांद खान पठाण, सय्यद लाल टेलर, सचिनगवळी, समीर शहा, विनोद नलावडे, सय्यद मोईनोद्दीन आदिचे शॉल पुष्पगुच्छ देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी बोलताना मुख्य जमादार विनोद बिघोत यांनी पत्रकार यांच्या कठीन कार्य कुशलता बद्दल बोलताना शासन पोलिस पत्रकार यांच्या कार्याबद्दल गौरव उदगार काढत तिघांनी समन्वयातून कार्य केल्यास योग्य व चांगले कार्य ठरवु शकते ज्यामुळे जनता व त्यांचा विकास घडु शकतो त्यामुळे सर्वांनी एकमेका सहाय्य सहकार्य करावे.



# आ. सतीश चव्हाण यांच्या हस्ते विविध विकास कामांचे लोकार्पण, भूमिपूजन

आधुनिक केसरी न्यूज

**सुलतानपूर :** गदाना, सुलतानपूर, भांडेगाव, खुलताबाद शहर आदी ठिकाणी आमदार सतीश चव्हाण यांच्या हस्ते आज (दि.7) 60 लक्ष रुपयांच्या विविध विकास कामांचे लोकार्पण व भूमिपूजन करण्यात आले. आमदार सतीश चव्हाण यांनी खुलताबाद तालुक्यातील सुलतानपूर येथे गाव अंतर्गत सी सी रस्ता करण्यासाठी मी 10 लक्ष, सुलतानपूर येथील मस्जिद परिसरात सामाजिक सभागृहाचे बांधकाम करण्यासाठी 10 लक्ष, भांडेगाव ते जाफरवाडी रस्त्यावर नळकांडी पूल करण्यासाठी 10 लक्ष असा एकूण 30 लक्ष रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला होता. सदरील विकास कामे पूर्ण झाले असून आज या कामांचे लोकार्पण आमदार सतीश चव्हाण यांच्या हस्ते करण्यात आले. तसेच आमदार सतीश चव्हाण यांनी गदाना येथील स्मशानभूमी परिसरात 25-15 योजनेअंतर्गत सी सी रस्ता करण्यासाठी 10 लक्ष, सुलतानपूर येथे गाव अंतर्गत सी सी रस्ता करण्यासाठी 10 लक्ष, भांडेगाव येथे गाव अंतर्गत सी सी रस्ता करण्यासाठी 10 लक्ष असा 30 लक्ष रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला असून आज सदरील कामाचे भूमिपूजन देखील आमदार सतीश चव्हाण यांच्या हस्ते करण्यात आले.

याप्रसंगी राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष अनिल चव्हाण, गंगापूर-खुलताबाद विधानसभा अध्यक्ष अशोक गायकवाड, माजी सभापती महेश उबाळे, माजी सभापती सुरेश चव्हाण, राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष गजानन फुलारे, राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे तालुकाध्यक्ष विनोद जाधव, अल्पसंख्याक विभागाचे तालुकाध्यक्ष श्री.जावेद पटेल, ज्ञानेश्वर दुधारे, सरपंच पोपट चव्हाण, ज्ञानेश्वर मातकर, मुशताक पटेल, उपसरपंच कैलास बडूगे, सुदाम वाघ, विजय वाघ, केशव अधाने, केशव जाधव, मिठू महालकर, सुनील जाधव, कुंडलिक अधाने, गंगाधर अधाने, छबु वाहुळ, प्रकाश अधाने, कारभारी जाधव, रामहरी तुपे, भाऊराव वाहुळ, मनोहर पाटील चव्हाण, पांडुरंग चव्हाण, उत्तम चव्हाण, बापू चव्हाण, बबन औटे, इब्राहिम शहा, अनिल श्रीखंडे, वसंत चव्हाण, सुधाकर वेताळ, अजिनाथ साळुंके, भगवान कामठे, नितीन वेताळ, अजीम मणियार, इद्रिस पटेल, अब्दुल रऊफ, असिफ शेख, हबीब शेख, मोहमद शेख, रियाज पठाण, मुबारक पठाण, विष्णू चव्हाण, किशोर कुकलारे, जगन्नाथ चव्हाण, पोपट वेताळ, अतुल चव्हाण, अनिल वेताळ, गोविंद वेताळ, गोरख चव्हाण, दादासाहेब वेताळ आदींची उपस्थिती होती.



राज्याचे कुलदैवत असणाऱ्या जेजुरीनगरीत आलेल्या विकसित भारत यात्रेचे स्वागत नगरपालिका पदाधिकारी वर्ग आणि शहर भाजप कार्यकर्त्यांनी भंडारा उधळून स्वागत केले. यावेळी जेजुरी मुख्याधिकारी चारुदत्त इंगोले आणि जिल्हाउद्योग अधिकारी सतीश खरात. छायाचित्र : विजयकुमार हरिश्चंद्रे

# गुणवत्ता मूल्यांकन निकषाधारे चार शाळांमध्ये पथदर्शी अभ्यास

## राज्यातील 54 शाळांचा समावेश : SQAAF राज्य समिती सदस्यांनी केली मूल्यांकन प्रक्रिया

आधुनिक केसरी न्यूज

**भुसावळ :** राज्यातील सर्व शाळांचे मूल्यांकन करण्यासाठी राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाला अनुसरून SQAAF स्कूल क्वॉलिटी असेसमेंट ॲण्ड ॲक्रिडेशन फ्रेमवर्क तयार करण्यात आला आहे. शाळा गुणवत्ता मूल्यांकनाच्या या निकष निर्मिती आराखड्याचा पथदर्शी अभ्यास महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद पुणे यांच्यातर्फे करण्यात आला. त्यासाठी राज्यभरातील 54 शाळांची निवड करण्यात आली. त्यात जळगाव जिल्ह्यातील चार शाळांमध्ये राज्य समिती सदस्यांनी भेटी देऊन मूल्यांकन केले. जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य डॉ. अनिल झोपे व अधिव्याख्याता डॉ. चंद्रकांत साळुंखे यांच्या मार्गदर्शनाखाली SQAAF तज्ज्ञ व राज्य समिती सदस्य डॉ. जगदीश पाटील, प्रमोद आठवले, दंगल पाटील व शामकांत रूले यांनी जळगाव जिल्ह्यातील नगरपरिषद शाळा क्र. 35 भुसावळ, जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा एकुलती, ता. जामनेर, मनपा सेंट्रल स्कूल 2 जळगाव आणि जिल्हा परिषद प्राथमिक शाळा घोडसगाव, ता. मुक्ताईनगर अशा चार शाळांना भेटी देऊन मूल्यांकन आराखड्याची पडताळणी केली. राज्य समितीने भेटी दिल्यावर शाळा गुणवत्ता मूल्यांकन आराखड्यात नमूद निकषानुसार क्षेत्र, मानके, पुरावे यांची माहिती पडताळून पाहण्यात आली. तसेच अंतर्गत व बाह्य घटकांचे मूल्यांकन करून शाळा सुधारात्मक बाबी देखील दर्शविण्यात आल्या. शाळा गुणवत्ता मूल्यांकन व प्रमाणन आराखड्यात अभ्यासक्रम व मूल्यमापन, प्रवेश व पायाभूत सुविधा, मानवी संसाधने व नेतृत्व, समावेशक पद्धती व लिंग समानता, व्यवस्थापन देखरेख व शासन आणि लाभार्थी समाधान अशी एकूण 6 क्षेत्रे, 58 उपक्षेत्रे आणि 123 मानके आहेत. या प्रत्येक मानकांचे चार स्तर असून पहिला प्रारंभिक, दुसरा प्रगतशील, तिसरा प्रवीण आणि चौथा प्रगत असे आहेत. प्रत्येक स्तराची वर्णन विधाने आहेत. पथदर्शी अभ्यासासाठी निवड करण्यात आलेल्या शाळांना भेटी देण्यात येवून गुणवत्ता मूल्यांकन व प्रमाणन आराखड्यात असलेल्या क्षेत्रनिहाय मानकांची पडताळणी केली. मूल्यांकन प्रणालीतील निष्कर्षाच्या आधारे आपली बलस्थाने व दुर्बलता ओळखण्याची क्षमता शाळांमध्ये निर्माण होते. त्यासाठी मूल्यांकन प्रणालीचे महत्त्व अनन्यसाधारण असल्याचे शाळा गुणवत्ता मूल्यांकन व प्रमाणन आराखडा तज्ज्ञ डॉ. जगदीश पाटील यांनी शाळा भेटीदरम्यान सांगितले.



# अध्यक्षपदी चव्हाण, उपाध्यक्षपदी मांडे तर सचिवपदी पाटील

आधुनिक केसरी न्यूज

**पिशोर :** तालुका पत्रकार संघाची दैनिक शिवनातीरचे संपादक मधु महाले यांच्या मार्गदर्शनाखाली व पुण्य नगरीचे तालूका प्रतिनिधी भास्कर पाटील यांच्या अध्यक्षेखाली २०२४-२५ साठी नवीन कार्यकारणी जाहीर करण्यात आली. यात अध्यक्षपदी नवराष्ट्र दैनिकाचे तालुका प्रतिनिधी सुरेश चव्हाण, उपाध्यक्षपदी दैनिक सामना वृत्तपत्राचे तालुका प्रतिनिधी विजयकुमार मांडे, सचिव दैनिक लोकपत्र वृत्तपत्राचे तालुका प्रतिनिधी कल्याण पाटील तर कार्याध्यक्षपदी दैनिक सम्राट वृत्तपत्राचे तालुका प्रतिनिधी अनिल शिरसाट यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. यावेळी दैनिक पुढारीचे तालुका प्रतिनिधी संजय मुचक, दैनिक दिव्य मराठीचे तालुका प्रतिनिधी संतोष निकम लोकमत समाचारचे तालुका प्रतिनिधी शेख इलियाज, दैनिक तरुण भारत वृत्तपत्राचे तालुका प्रतिनिधी शेखर मांडे, झी २४ तास प्रतिनिधी अनिल गायकवाड, आदि उपस्थितीत होते.



# टोलमाफी देण्याची मनसेची मागणी

आधुनिक केसरी न्यूज

**उरण :** शिवडी (मुंबई )ते न्हावा (उरण) या दरम्यान अटल सेतूचे काम पूर्ण झाले असून या लिंकचे उदघाटन शुक्रवार दि १२ जानेवारी २०२४ रोजी देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते होणार आहे.सागरी मार्गावर प्रवास करण्यासाठी सिंगल टोल २५० रुपये व रिटर्न टोल ३७५, दैनिक पास ६२५ रुपये टोल, मासिक पास १२,५०० इतके रुपये टोल नाका आकारले जाणार आहे.यामुळे सर्वसामान्यांच्या खिशाला खूप मोठा भुर्दंड बसणार आहे. सर्वसामान्य व्यक्ती एवढे रुपये भरून अटल सागरी सेतू वरून प्रवास करू शकत नाही. शिवाय अटल सेतू हा सागरी महामार्ग प्रकल्प उरण व पनवेल तालुक्यातील नागरिकांच्या जमिनीतून गेल्याने उरण पनवेल तालुक्यातील स्थानिक नागरिकांना अटल सेतू मार्गावर टोलमाफी मिळावी अशी मागणी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे रायगड जिल्हाध्यक्ष संदेश ठाकूर यांनी महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री श्री. एकनाथ शिंदे, एमएमआरडिएचे मुख्य आयुक्त संजय मुखर्जी, रायगडचे जिल्हाधिकारी योगेश म्हसे यांच्याकडे पत्रव्यवहाराद्वारे केली आहे.न्हावा शिवडी हा २२ ते २४ किलोमीटरचा एम. एम. आर. डी.ए चा महत्वकांक्षी सागरीमहामार्ग प्रकल्प पूर्णत्वास येत आहे. या प्रकल्पासाठी उरण व पनवेल तालुक्यातील स्थानिकांच्या जमिनी संपादित केल्या आहेत. तसेच हा प्रकल्प पूर्ण होण्यासाठी स्थानिकांचा मोलाचा हातभार लागला आहे. ह्या सेतूमुळे उरण पनवेल वासीयां सोबत रायगड तसेच कोकणवासीयांचा प्रवास हा सुखकर तसेच वेळेची बचत करणार असेल. एम एम आर डी ए तसेच सिडकोचे अनेक प्रकल्प उरण पनवेल तालुक्यातील स्थानिकांच्या जमिनीवर झाले आहेत.आणि यापुढे अनेक प्रकल्प होणार आहेत. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या म्हणण्यानुसार स्थानिकांना त्यांच्या आधारकार्डच्या आधारे टोलमुक्ती करण्यात यावी त्या अनुषंगाने उरण पनवेल तालुक्यातील स्थानिकांना या सागरी सेतूवर टोलमुक्ती देण्यात यावी अशी मागणी पत्रव्यवहाराच्या माध्यमातून संदेश ठाकूर यांनी प्रशासनाकडे केली आहे.

# धडेकर यांना कै. विलासराव देशमुख पत्रकारिता पुरस्कार जाहीर

आधुनिक केसरी न्यूज

**बाबुराव गोनारकर**

**धर्माबाद :** कै. दुर्गादास सराफा प्रतिष्ठान व हिंदी बाणा लाईव्ह च्या वतीने दरवर्षी प्रमाणे याही वर्षी विविध क्षेत्रातील मान्यवरांना दिले जाणारे पुरस्कार नुकताच १ जानेवारी रोजी जाहीर झाला असून यात धर्माबाद तालुक्यातील ज्येष्ठ पत्रकार तथा धडाडीचे कार्यकर्ते व बहुभाषिक पत्रकार संघटनेचे तालुका अध्यक्ष तथा नगर पालिका दक्षता समिती सदस्य, दै.गावकरीचे तालुका प्रतिनिधी गंगाधर इरवंता धडेकर यांना माजी मुख्यमंत्री कै. विलासराव देशमुख पत्रकारिता पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. या पुरस्काराचे वितरण केंद्रीय सडक मंत्री नितीन गडकरी, माजी मंत्री तथा युवा शिवसेनाप्रमुख आदित्य ठाकरे, माजी मंत्री पंकजाताई मुंडे यांच्यासह आजी-माजी मंत्राच्या मान्यवरांच्या उपस्थित पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे.



दै. गावकरीचे धर्माबाद तालुका प्रतिनिधी गंगाधर धडेकर यांनी गेल्या अनेक वर्षापासून पत्रकारितेच्या माध्यमातून ग्रामीण भागातील विविध प्रलंबित प्रश्न सामाजिक समस्या दिन दुबळ्याचे गोरं गरिबांच्या अडचणी यासह सामाजिक धार्मिक कार्यातील योगदान यांच्या सह बातमीची दखल घेऊन कै. दुर्गादास सराफा प्रतिष्ठान व हिंदवी बाणा लाईव्ह पुरस्कार समितीने गंगाधर धडेकर यांना उत्कृष्ट पत्रकारितेतील पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे यामुळे त्यांचा सर्व स्तरातून अभिनंदन कौतुक करण्यात येत आहे. नुकताच दि:३१ डिसेंबर रोजी संप्तरंगी साहित्य मंडळ महाराष्ट्र राज्य च्या वतीने ३ जनसंवाद राज्यस्तरीय ग्रामीण साहित्य संमेलन , आनंद दत्तधाम श्रीक्षेत्र माहूरगड येथे घेण्यात आले.यावेळी राष्ट्रसंत साईनाथ महाराज वसमतकर, जेष्ठ पत्रकार सरफराज दोसाणी, सुप्रसिद्ध साहित्यिक प्रबोधनकार मा.अनंत राऊत , आंबेडकर चळवळीचे नेते ॲड. विजय गोणारकर, गटशिक्षणाधिकारी आर.एल.मुधोळकर ग्रामीण कवी नागोराव डोंगरे, संयोजक रणजित गोणारकर यांच्या हस्ते गंगाधर धडेकर यांना मुकनायक पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.

# घे पंगा खेळाचा कर दंगा विजयाचा..

आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** भारतीय जनता पार्टी वैजापूर गंगापूर तसेच युवा मोर्चा यांच्या मार्फत नमो चषक 2024 चे आयोजन करण्यात आले असून यात भव्य अश्या क्रीडा स्पर्धा व सांस्कृतिक महोत्सवाचे आयोजन करण्यात आले असून भाजपाचे जिल्हा सरचिटणीस डॉ. दिनेश परदेशीं व प्रदेश कार्यकारणी सदस्य एकनाथ जाधव यांनी जास्तीत जास्त संख्येने सहभाग नोंदवावा असे आवाहन केले आहे.

क्रीडा व सांस्कृतिक महोत्सवाचा कालावधी 12 जानेवारी ते 26 जानेवारी असणार असून 27 जानेवारी ला अंतिम बक्षीस वितरण करण्यात येणार आहे. स्पर्धेत सहभागी होण्यासाठी 10 जानेवारी पर्यंत नोंदणी करता येईल अशी माहिती डॉ दिनेश परदेशीं यांनी दिली असून यात रस्सीखेच स्पर्धेसाठी प्रति टीम ८ खेळाडू असतील. तर कुस्ती, फुटबॉल, खो-खो, व्हॉलीबॉल, क्रिकेट, कॅरम, रस्सीखेच, बुद्धिबळ, कब्बडी, धावणे (१०० मीटर), धावणे (४०० मीटर) या स्पर्धा पुरुष गट व महिला गट अशा स्वतंत्र होणार असून सांस्कृतिक कार्यक्रमात चित्रकला, रांगोळी, गीत गायन, नृत्य स्पर्धा, एकांकिका, वक्तृत्व या स्पर्धा घेण्यात येणार आहे.



# नायलॉन मांजा विक्रेत्यावर गुन्हे शाखेची कारवाई

आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** मकरसंक्रांतीचा सण जवळ येत असल्याने पतंगबाज पतंगबाजीच्या तयारीत व्यस्त आहेत. पतंग कापण्यासाठी नायलॉन मांजाचा खुलेआम वापर होताना सर्वच ठिकाणी दिसून येत आहे. जे पक्षी आणि मानवांसाठी घातक आहे. आता नायलॉनच्या मांज्या मुळे अनेकांना जीव गमवावा लागला आहे. त्यामुळे अनेक जण गंभीर जखमी पण झाले आहेत. वैजापूर शहरात छुप्या पद्धतीने नायलॉन मांजा विक्री करणाऱ्या तरुणावर स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने कारवाई करून त्याच्याकडून 2000 रुपये किमतीचा नायलॉन मांजा जप्त केला असून याबाबत पोलिसांकडून मिळालेली माहिती अशी की, वैजापूर शहरातील सुंदर गणपती गल्ली येथील प्रसाद जगदीश सूर्यवंशी नावाच्या तरुणाने आपल्या घरी नायलॉन चा मांजा छुप्या पद्धतीने विक्रीसाठी आणला असल्याची माहिती संभाजीनगर गुन्हे शाखेच्या पोलिस पथकाला खबऱ्याकडून मिळाली होती. माहिती मिळताच गुन्हे शाखेच्या पथकाने सुंदर गल्ली येथील प्रसाद सूर्यवंशी यांच्या घरावर छापा टाकला त्यामध्ये पोलिसांना 2000 रुपये किमतीचे नायलॉनचा मांजा सापडला.पोलिसांनी



**मांज्यामुळे जीवावर बेतले :** शुक्रवारी वैजापूर शहरातील डीपी रोड येथे गणेश बाबासाहेब गलांडे वय 24 वर्षीय तरुण रस्त्याने जात असताना नायलॉन चा मांज्या गळ्यात अडकून गळा चिरल्याने सदरील तरुणावर छत्रपती संभाजीनगर उपजिल्हा रुग्णालय येथे उपचार सुरु आहे . लहान मुले, नागरिक नायलॉन चा मांजा बिनधास्त पणे घेऊन जाताना दिसत असून पतंग उडविणारे पतंगबाज यांच्याकडे नायलॉन मांजा असल्यास त्यांना ताब्यात घेऊन विचारपूस केल्यास नक्कीच नायलॉन मांजा विक्रेते पकडल्या जातील अशी नागरिकांत चर्चा बघावयास मिळत आहे . परिणामी खबरदारी म्हणून गळ्याभोवती मफलर, रुमाल व कपडा लपेटून बाहेर पडावे व दुचाकी स्वारांनी गाडी हळू चालवून खबरदारी घ्यावी .

प्रसाद सूर्यवंशी याला ताब्यात घेऊन वैजापूर पोलीस ठाण्यात आणले व त्याच्यावर गुन्हा दाखल केल्यानंतर आरोपीला नोटीस देऊन सोडून देण्यात आले.ही कारवाई स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलीस उपनिरीक्षक दुलत, पोलीस हेडकॉन्स्टेबल संजय घुगे, शिरसाठ, निकम, पोलीस नाईक वाघ, तांदळे आदीं सह पथकाने केली. नायलॉन मांजा विक्री वर बंदीची वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांची सूचना असूनही नायलॉन चा मांजा बिनधास्त पणे विकला जात असून याकडे लक्ष देण्याची गरज आहे.



# भारतीय अनुसूचित जाती मोर्चा तालुका अध्यक्षपदी वाकळे

आधुनिक केसरी न्यूज

**बि. डी. रामपूरकर**

**जिंतूर :** दि. 6 रोजी भारतीय जनता पार्टी अनुसूचित जाती मोर्चा तालुका जिंतूर कार्यकारणीची निवड आदरणीय मा.आ. रामप्रसादजी बोर्डीकर साहेब आदरणीय आ.मेघनादीदी साकोरे बोर्डीकर यांच्या मार्गदर्शनाखाली मार्गदर्शनाखाली जिल्हा सरचिटणीस सुमेध सूर्यवंशी व तालुका अध्यक्ष विजयकुमार वाकळे यांच्या वतीने करण्यात आली यामध्ये राहुल शिंदे (ता. सरचिटणीस), रोहिदास खंदारे ,(ता सरचिटणीस) गणेश पारवे (ता सरचिटणीस), संतोष घोडे (ता सरचिटणीस), लक्ष्मणघन सावंत (ता उपाध्यक्ष), बंडू गायकवाड (ता उपाध्यक्ष), मारुती वैरागड (ता उपाध्यक्ष) बापूराव चौरे (ता उपाध्यक्ष), संदीप भवरे (ता उपाध्यक्ष), सिद्धार्थ वाकळे (ता उपाध्यक्ष) ज्ञानोबा वाघ (ता उपाध्यक्ष), रोहिदास पंडित (ता चिटणीस), रमेश चव्हाण (ता चिटणीस), अमोल वाघ (ता चिटणीस), विजय खंदारे (ता चिटणीस) बाळासाहेब कामिटे (ता.कोषाध्यक्ष), गोविंद चव्हाण (सदस्य) ,भगवान साळवे (सदस्य), दयानंद वाघ (सदस्य), शिवाजी वाकळे (सदस्य) याप्रसंगी भाजप जिंतूर विधानसभा प्रमुख डॉ.पंडित दराडे, भाजप तालुका अध्यक्ष विनोद राठोड, मुन्नाभाऊ गोरे प्रमोद चव्हाण, दत्ता नवले, भानुदास वाळके, मतीन तांबोळी, सुनील मते गोपाळ रोकडे ,गजानन गडदे, माधव दराडे, रमेश (गुज्जर) मोहिते, आकाश चराटे, युवराज घनसावत आदी जण उपस्थित होते.

# पक्का रस्ता द्या; अन्यथा हलगीनाद आंदोलन

## रिपब्लिकन पक्ष, बहुजन कल्याण सेनेचा इशारा

आधुनिक केसरी न्यूज

**सुशिल गायकवाड**

**लोणंद :** रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष दिपक भाऊ निकाळजे यांच्या नेतृत्वाखाली तसेच महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष दादासाहेब ओव्हाळ,पुणे जिल्हा अध्यक्ष सचिन भाऊ खरात, युवा उपाध्यक्ष अमोल साबळे आणि बहुजन कल्याण सेनेचे बि.के.भालेराव यांच्या मार्गदर्शनाखाली बारामती तालुक्यातील कऱ्हावागज. धोतरे वस्ती ते भिलारवाडी या दरम्यान हक्काचा पक्का रस्ता होण्याबाबत तहसीलदार बारामती गणेश शिंदे यांना निवेदन देण्यात आले.पक्का रस्ता न दिल्यास १८ जानेवारी रोजी हलगी नाद आंदोलन करण्यात येणार असल्याचा इशारा निवेदनाद्वारे देण्यात आलेला आहे.यावेळी रिपब्लिकन पक्षाचे खंडाळा तालुका अध्यक्ष पवन धायगुडे पाटील, सल्लागार अनिल केदारी, मंगल बनकर बबीता क्षीरसागर, उत्तम बनकर, राजेश बनकर, चंद्रकांत लोणकर,अशोक बनकर,हणमंतराव बनकर, हर्षद गावडे,शेखर बनकर, निलेश लोणकर तसेच पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते. दिलेल्या निवेदनात असे म्हटलेले आहे की, कऱ्हावागज धोतरे वस्ती ते भिलारवाडी हे अंतर तीन किलोमीटर आहे.ह्या तीन किलोमीटर अंतरामध्ये लोणकर मळा,बनकर वस्ती,वाबळे वस्ती,खोमणे वस्ती,जगताप वस्ती या सर्व वस्त्या वास्तव्यास आहेत.या सर्व वस्त्या वरील लोकसंख्या अंदाजे दोनशे च्या वरती आहे.या लोकांना दैनंदिन जीवनातील गरजेच्या वस्तू खरेदी करण्यासाठी कऱ्हावागज या ठिकाणी जावे लागते.कारण या लोकांची मुख्य बाजारपेठ ही कऱ्हावागजच आहे. त्यामुळे आत्ता सध्या रस्त्यावर खड्डे पडले आहेत.रस्ता पुर्णपणे खडतर आहे.त्यामुळे या वस्तीत सर्व लोक हे शेतकरी वर्ग असल्याने त्यांना शेतातील माल विक्रीसाठी ने आण करण्याकरिता रस्त्यावरुन जाता येता मोठी कसरत करावी लागत आहे.तसेच शाळेतील विद्यार्थ्यांना, आबालवृद्ध, महिला भगिनींनी, गरोदर मातांना याचा नाहक त्रास होत आहे.हा रस्ता पक्का झाल्यास भिलारवाडी येथील लोकांना जे सहा ते सात किलोमीटर आंतर वळसा घेऊन कऱ्हावागज या ठिकाणी जावे लागते ते अंतर मधुन रस्ता पक्का झाल्यास ते तीन किलोमीटर होईल.याचा प्रशासनाने गांभीर्याने विचार करावा.असे म्हटलेले आहे आहे. पुढे असे ही सांगण्यात आलेले आहे कीआपला भारत देश स्वातंत्र्य होऊन ७५ वर्ष पूर्ण झाली.आपण पंचाहत्तर वा अमृत महोत्सव साजरा केला.परंतु या ठिकाणी राहणाऱ्या लोकांना आपण आजुन पारतंत्र्यात राहत आहे. असे वाटत आहे.कारण आमदार खासदार यांच्या फार्महाऊसवर जाण्यासाठी पक्का रस्ता आहे.परंतु जगाचा पोशिंदा शेतकरी वर्ग यांच्या वाड्या वस्त्यांवर जाण्यासाठी पक्का रस्ता नाही काय पाप केले आहे.ह्या लोकांनी की यांना जिवंत पणी मरण यातना भोगाव्या लागतात. तरी या सर्व गोष्टींचा गांभीर्याने विचार करुन कऱ्हावागज धोतरे वस्ती ते भिलारवाडी या दरम्यान हक्काचा पक्का रस्ता लवकरात लवकर पूर्ण करावा अन्यथा रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष आदरणीय दिपक भाऊ निकाळजे यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष दादासाहेब ओव्हाळ यांच्या मार्गदर्शनाखाली व पुणे जिल्हा अध्यक्ष सचिन भाऊ खरात आणि युवा उपाध्यक्ष अमोल साबळे तसेच बहुजन कल्याण सेना,तसेच विविध संघटना यांच्या वतीने झोपेचं सोंग घेतलेल्या प्रशासनाला जाग येण्यासाठी १८ जानेवारी रोजी बारामती तहसील ऑफिस समोर हालगी नाद आंदोलन करण्यात येईल.



गुप्तरोगाबाबत काहीही लपवू नका



(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

शहरातील विश्वसनीय बिग सुपर मार्केट

महावीर

घर संसार



किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | ॲल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही

सुमित 7620111118
राजेश जैन 7588348738

रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117

व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181

वितरण स्थितीसाठी 9021395308

घाऊक चौकशीसाठी 7620111118

www.mahavirbestprice.com
sumitparakh73@gmail.com

S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर